SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५६ वा
वार्षिक अहवाल : २०१८-१९

५६ वा वार्षिक अहवाल : २०१८-१९

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजवंदन करताना मा. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे
यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी शेजारी समारंभाचे प्रमुख पाहुणे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. (डॉ.) पी. पी. पाटील

Estd. 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५६ वा
वार्षिक अहवाल

१ जुलै, २०१८ ते ३० जून, २०१९ या कार्यकालावधीमध्ये
शिवाजी विद्यापीठाच्या कार्याची माहिती देणारा हा अहवाल आहे.
सदरचा अहवाल विद्यापीठ अधिष्ठाता मंडळाच्या मार्गदर्शनाखाली
तयार केला असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
मधील कलम १३६ (१) अन्वये अधिसभेस सादर करण्यात येत आहे.

मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव
कुलपती

मा. प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे

कुलगुरू

मा. प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र–कुलगुरू

५५ व्या दीक्षान्त सोहळ्याचे अध्यक्ष मा. कुलपती श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव (राज्यपाल, महाराष्ट्र राज्य),
प्रमुख पाहुणे मा. श्री. भीमराया म्हेत्री (संचालक, आय.आय.एम., तिरुचिरापल्ली)
यांच्यासमवेत मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू, विविध विद्याशाखांचे मा. अधिष्ठाता, मा. कुलसचिव,
मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखाधिकारी आणि मा. व्यवस्थापन परिषद सदस्य

'युरोपियन युनियन' च्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या 'इक्वम' या प्रकल्पात भारतातील आठ विद्यापीठांमध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठात शिकत असणारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी रेशीम लागवडीचा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला.

वनस्पतीशास्त्र अधिविभागात औषधी वनस्पतींसाठी बसविण्यात आलेल्या डिस्टीलरीचे उद्‌घाटन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के

विद्यापीठात आयोजित सुंगधी व औषधी वनस्पती विषयक कार्यशाळेत डॉ. एस. एस. बर्वे, उपाध्यक्ष, वैज्ञानिक संशोधन केंद्र, मुलुंड (मुंबई) हे प्रदर्शनातील औषधी वनस्पतींचे निरीक्षण करताना.

विद्यापीठाच्या जलसंवर्धन कार्याची पाहणी करताना ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा.

'नॅक' मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरूपाच्या अनुषंगाने नॅक (बंगळूर) चे उपसल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

'नॅक' मूल्यांकनाचे बदललेले स्वरूप या विषयावर विद्यापीठात एक दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. प्रमोद लाबे.

चौथ्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र टाईम्स, श्रीक्षेत्र सिद्धगिरी, कणेरी मठ आणि भागिरथी महिला संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब बहुउद्देशीय सभागृह आयोजित योगशिबिरात सहभागी योगसाधक.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दिक्षांत समारभांत उपस्थित स्नातकांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभात संबोधित करताना प्रमुख पाहुणे डॉ. भीमराया म्हेत्री (संचालक, आय.आय.एम., तिरूचिरापल्ली)

विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी मान्यवर व विद्यार्थी

शिवाजी विद्यापीठामध्ये इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इरादापत्र स्वीकारताना केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत सोबत (डावीकडून) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे राज्यपाल (महाराष्ट्र राज्य) श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव, केंद्रीय रेल्वेमंत्री श्री सुरेश प्रभू आदी.

शिवाजी विद्यापीठात 'बेटी बचाओ' अभियानांतर्गत पथनाट्यातून जनजागृती करणारे विद्यार्थी

'आविष्कार' संशोधन महोत्सवांतर्गत उपस्थितांना आपल्या संशोधनाची माहिती देताना संशोधक विद्यार्थी

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व रोजगार संधी विकास केंद्रातर्फे पुणे येथे आयोजित कौशल्य विकास आणि रोजगार मेळाव्यास मोठा प्रतिसाद लाभला.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राला दोन लाख रुपयांचा निधी प्रदान करताना 'सोक्टास' कंपनीचे मुख्य कार्यचालन अधिकारी श्री. सदानंद गुप्ता

शिवाजी विद्यापीठ आणि जहांगीरनगर विद्यापीठ, ढाका(बांग्लादेश) यांच्यादरम्यान फॅकल्टी व स्टुडंट एक्स्चेंज कार्यक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि सांगलीची समृद्धी टीबीआय फाऊंडेशन यांच्यादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

'राष्ट्रीय युवा साहित्य अकादमी पुरस्कार–२०१८' मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे विद्यार्थी श्री. नवनाथ गोरे यांना गौरविण्यात आले.

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड येथे आयोजित 'छ. प्रतापसिंह महाराज व्याख्यानमालेत 'समाजसुधारक व महाराष्ट्रातील समाज परिवर्तन' या विषयावर व्याख्यान देताना श्री. किशोर बेडकिहाळ.

श्री. चंद्रकांतदादा पाटील, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य आणि पालकमंत्री, कोल्हापूर मुलींना बसपास करिता रक्कम वाटप करताना

इंग्रजी अधिविभागात आयोजित 'ज्ञानविस्तार मानव्य व्याख्यानमालेत करिअरचा मार्ग कसा निवडाल?: 'पायवाट की आडवाट' या विषयावर बोलताना नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) पंडीत विद्यासागर

विद्यापीठात आयोजित 'स्वच्छता ही सेवा' अभियानात सहभागी विद्यार्थी–विद्यार्थिनी.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर 'आव्हान २०१९' मध्ये विजेतेपदाचा फिरता चषक पटकावणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

'कलर्स २०१८' क्रीडा पुरस्कार विजेते विद्यार्थी–विद्यार्थिनी.

भूगोल अधिविभागाच्यावतीने आयोजित आपत्ती व्यवस्थापन विषयक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना अमेरिकेतील पड्र्यू विद्यापीठाचे प्रा. व्यंकटेश मेरवाडे.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्यावतीने आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर.

शिवाजी विद्यापीठाच्या आचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार प्रा. एन. डी. पाटील यांना प्रदान करताना ज्येष्ठ नेते मा. श्री. शरद पवार

शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील 'गुणवंत शिक्षक' डॉ. आर. के. कामत,
प्राध्यापक व विभागप्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील 'गुणवंत शिक्षक' डॉ. श्रीमती भारती पाटील,
प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील 'गुणवंत सेवक'
प्रबंधक – शिवाजी कॉलेज, सातारा

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभागातील 'गुणवंत सेवक'
श्री. भास्कर राजाराम सांगावकर, वरिष्ठ सहायक

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभागातील 'गुणवंत सेवक'
श्री. सदानंद श्रीधर माने, वरिष्ठ सहायक

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभागातील 'गुणवंत सेवक'
श्री. मारुती नारायण मगदूम, हवालदार

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभागातील 'गुणवंत सेवक' श्रीमती टी. एस. भूतकर,
सहायक कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभागातील 'गुणवंत सेवक' श्री. नामदेव नानासो चरापले,
सिनिअर टेक्निकल असिस्टंट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अखिल भारतीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत 'डिस्कस थ्रो' स्पर्धेत यामध्ये
सुवर्ण पदक विजेता कीर्तीकुमार जे. बेनके

सिंहावलोकन

प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे,
कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वार्षिक अहवाल आपल्यासमोर ठेवताना मला मनस्वी आनंद वाटतो आहे. एक अग्रगण्य विद्यापीठ म्हणून शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात वेगळा असा ठसा उमटविला आहे. अध्यापन, संशोधन आणि विस्तार कार्यात शिवाजी विद्यापीठ नेहमीच अग्रभागी राहिले आहे. या अहवालात शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षातील विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीचा आलेख पहायला मिळेल.

१९६२ साली स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाने अनेक क्षेत्रांत कालसुसंगत शैक्षणिक व सामाजिक कार्य केले आहे. शैक्षणिक गुणवत्ता अध्यापन, संशोधन आणि विस्तारकार्यात शिवाजी विद्यापीठाने नेहमीच उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या परिश्रमाने आणि दूरदृष्टीने विद्यापीठाची पायाभूत उभारणी झाली, पुढे तिचा अधिक विस्तार झाला.

पश्चिम महाराष्ट्राच्या शैक्षणिक वाटचालीत शिवाजी विद्यापीठाने गेल्या ५५ वर्षात मोलाचे योगदान दिलेले आहे. विद्यापीठाने राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अध्यापन, संशोधन आणि प्रशासन या बाबींत आज शिवाजी विद्यापीठाचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिह्यांमध्ये असून संलग्नित एकूण महाविद्यालयाची संख्या २९३ आहे. शिवाय विविध संशोधन संस्था, विद्यापीठाशी संलग्न असून विविध महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा प्राप्त झाला आहे. विद्यापीठाशी संलग्न अनेक महाविद्यालयांचे 'नॅक' मूल्यांकन पुनर्मूल्यांकन झालेले आहे. तसेच या वर्षी विद्यापीठ नॅक पुनर्मूल्यांकनासाठी सामोरे जात आहे. या प्रक्रियेची अंतिम तयारी झाली आहे.

शिवाजी विद्यापीठात एकूण ३३ पदव्युत्तर विभाग, १४ अध्यासन संशोधन केंद्र आणि १० अध्यासने कार्यरत आहेत. सुमारे तीन लाख विद्यार्थ्यांनी चार विविध विद्याशाखांतून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण

आणि संशोधन स्तरावरील शिक्षण दिले जाते. याच बरोबर काम करून शिकणाऱ्या, मुख्य प्रवाहातून शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दूरशिक्षण विभागही विद्यापीठात जोमाने कार्यरत आहे.

विद्यापीठाच्या प्रगतीसाठी विविध अधिविभागातील प्राध्यापक संशोधन कार्यात सतत प्रयत्नशील असून विविध संस्थांकडून संशोधन निधी विद्यापीठाला प्राप्त होत आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाबाबत भारतातील विद्यापीठांच्या मूल्यांकनात शिवाजी विद्यापीठाचे मानांकन हे उच्चतम आहे.

उच्चशिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योग निर्मिती नाविन्यपूर्ण व अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी अभ्यासक्रम या सूत्रांच्या जोरावर विद्यापीठाने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

वर्षभरातील व्याख्यानमाले अंतर्गत मान्यवर अभ्यासकांनी विद्यापीठ अधिविभागात व महाविद्यालयात व्याख्यानांचे यशस्वी आयोजन केले. बौद्धिक संसाधन व देवघेव हा ज्ञाननिर्मितीचा महत्त्वाचा घटक आहे. त्या अनुषंगाने वर्षभरात विविध विषयातील महत्त्वाच्या चर्चासत्रांचे, कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाने स्थापनेपासून आपला सामाजिक बांधिलकीचा वारसा जपलेला आहे. २०१९ या वर्षात कोल्हापूर सांगली शहराला बसलेला पावसाचा तडाखा आणि त्या नैसर्गिक आपत्तीत आपल्या मदतीच्या हाताने लोकजीवन सावरण्याचा प्रयत्न विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील लोकांनी केले. सामाजिकदृष्ट्या ही एक उल्लेखनीय बाब म्हणावी लागेल.

जगभरातील विविध देशांतील नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय अवस्था पाहिल्यास आपण पर्यावरणाच्या ऱ्हासाकडे वाटचाल करत आहोत. याचासाठी पर्यावरण रक्षणाचा एक छोटासा प्रयत्न म्हणून शिवाजी विद्यापीठाने शासनाच्या वृक्ष लागवाड मोहिमेतंर्गत वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात १३००० वृक्ष लागवडीच्या संकल्पाचा प्रारंभ महसूल तथा पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत केला. वृक्ष लागवड एक पर्यावरणीय उत्तरदायित्त्व म्हणून करण्यास आम्हांला अत्यंत आनंद झाला. विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे आपली मान अभिमानाने उंच ठेवलीच आहे. याचीच प्रचिती तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रो. हंग यू आणि प्रो. सर्हायन हसिनग यूई यांनी विद्यापीठाला भेट देऊन क्रीडा विभाग, परिसर व सुविधांची पाहणी केली.

या वर्षीच्या अहवाल निर्मितीत नेहमीप्रमाणे अनेकांचे सहाय्य लाभले. पुढील वाटचालीतही शिवाजी विद्यापीठाच्या लौकिकात भर पडेल अशी कामगिरी विद्यापीठ निश्चितच करेल असा विश्वास वाटतो.

प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अधिष्ठाता मंडळ अध्यक्ष : प्र-कुलगुरू यांचे मनोगत

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. या अहवालात सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या अनेक विविध उपक्रमांचा व प्रगतीचा आढावा घेतला आहे.

शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या थोर युगकर्त्याच्या नावाने सुरू झालेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाला थोर समाजसुधारक व स्त्री शिक्षणाचे प्रणेते महात्मा फुले, सामाजिक न्याय प्रत्यक्ष अंमलात आणणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. कोल्हापूरात विद्यापीठ व्हावे यासाठी कै. मा. यशवंतराव चव्हाण व लोकनेते बाळासाहेब देसाई, डॉ. सी. रा. तावडे यांनी प्रयत्न केले. विद्यापीठ स्थापनेनंतर प्रथम कुलगुरू मा. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी या विद्यापीठाच्या उभारणीत अथक परिश्रम घेतले.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासात राष्ट्रीय स्तरावरील संशोधनात शिवाजी विद्यापीठाचा 'एच इंडेक्स' ८६ इतका असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचे मानांकन देशात उंचावले आहे. संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने - अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व औद्योगिक संस्थांबरोबर सामंज्यस्य करार केले आहेत. विद्यापीठ केंद्राच्या माध्यमातून कौशल्याधारित प्रशिक्षण व समाजोपयोगी संशोधन व मनुष्यबळ विकास अशा प्रशिक्षण-संशोधन-विकास या तीन घटकांवर भरीव काम होत आहे. विद्यापीठात ॲड-ऑन अभ्यासक्रमही सुरू केला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या रोजगार क्षमतेत वृध्दी होईल. विज्ञान अधिविभागांबरोबरच सामाजिक शास्त्रे व भाषा विषयांची कामगिरीही स्तुत्य स्वरूपाची आहे. हिंदी विषयांत कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू करणारे

शिवाजी विद्यापीठ पहिले आहे. विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान विभागाची अत्यंत चांगली प्रगती सुरू आहे.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रात रिसोर्स सेंटर फॉर इन्क्लुजिव्ह एज्युकेशन कार्यान्वित झाल्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांची मोठी सोय झाली आहे. तसेच विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या बैठकांचे कामकाज कागदविरहित होण्याच्या दृष्टीने ऑनलाईन सॉफ्टवेअरची यशस्वी चाचणी झाली आहे.

पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये प्रदान करण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयांतून कौशल्य विकास उपक्रम राबविण्यात आले. 'स्कील ऑन व्हील्स' या उपक्रमांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील विविध गावात जाऊन नागरिकांना युवकांना हवे त्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून 'चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम' अर्थात सीबीसीएस पद्धती सर्व पदवी अभ्यासक्रमाना लागू करण्यात येणार आहे. गेल्या वर्षभरात विद्यापीठात अनेक नवे उपक्रम राबविण्यात आले. विद्यापीठाचा कार्यविस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. आणि या वाढत्या कार्यविस्ताराबरोबरच विद्यापीठाचा लौकीकही वाढत आहे. या सर्वाचे प्रतिबिंब या वार्षिक अहवालात पडलेले आपणास दिसते.

विद्यार्थ्यांची आणि संशोधनाची गुणवत्ता वाढवून समाजाभिमुख संशोधन करण्यावर विद्यापीठ सतत विचार करत आहे. समाजातील जास्तीत जास्त घटकांना विद्यापीठातील संशोधनाचा फायदा व्हावा, या हेतूने संशोधन होत आहे. विद्यापीठातील विविध अधिविभाग व अभ्यास केंद्रे व संलग्नित महाविद्यालये आणि इतर सर्व सहाय्य करणाऱ्या संघटना या कामात मोलाचे योगदान देत आहेत. विविध क्षेत्रात विद्यार्थी यश प्राप्त करून विद्यापीठाचा लौकीक वाढवत आहेत.

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू

वार्षिक अहवाल समिती अध्यक्ष मनोगत

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. या अहवालात इ. स. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या अनेकविध शैक्षणिक उपक्रमांचा व प्रगतीचा आढावा घेतला आहे.

गेल्या वर्षभरात विद्यापीठात अनेक नवे उपक्रम राबविण्यात आले. विद्यापीठाने ३.१६ इतक्या सर्वाधिक सीजीपीए गुणांकनासह 'नॅक'ची 'अ' श्रेणी प्राप्त करून राज्यातील अग्रमानांकित विद्यापीठ होण्याचा बहुमान पटकावलेला आहे. विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधनकार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने संशोधन व विकासासाठी भारतातील बहुतेक सर्व शिखर संस्थांकडून विद्यापीठास आर्थिक निधी प्राप्त झाला आहे. विद्यापीठाचा कार्यविस्तार दिवसेंदिवस वाढत आहे आणि या वाढत्या कार्यविस्ताराबरोबरच विद्यापीठाचा लौकिकही वाढत आहे. या सर्वाचे प्रतिबिंब या वार्षिक अहवालात पडलेले आपणास दिसते.

विद्यार्थ्यांची आणि संशोधनाची गुणवत्ता वाढवून समाजाभिमुख संशोधन करण्यावर विद्यापीठ सतत विचार करत आहे. समाजातील जास्तीत जास्त घटकांना विद्यापीठातील संशोधनाचा फायदा व्हावा, या हेतूने संशोधन होत आहे. विद्यापीठातील विविध अधिविभाग व अभ्यास केंद्रे, संशोधन केंद्रे व संलग्नित महाविद्यालये आणि इतर सर्व साह्य करणाऱ्या संघटना या कामात मोलाचे योगदान देत आहेत. विविध क्षेत्रात विद्यार्थी यश प्राप्त करून विद्यापीठाचा लौकिक वाढवत आहेत.

हा अहवाल सादर करीत असताना विद्यापीठाचे मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, मा. कुलसचिव, व्यवस्थापन परिषदेचे मा. सदस्य, विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख व प्राचार्य यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले, त्याबद्दल त्या सर्वांचे मी नम्रतापूर्वक आभार मानतो.

सेमिनार विभागातील कर्मचाऱ्यांचे सर्व माहिती संकलित करण्याच्या कामी मोलाचे सहकार्य लाभले. वार्षिक अहवाल समितीच्या सर्व सदस्यांनी संपादनाच्या कार्यात महत्त्वपूर्ण सहकार्य केले. मजकुराचा आशय आणि अहवालाच्या मांडणीबाबत वेळोवेळी महत्त्वपूर्ण चर्चा केल्या. या सर्वांचे मार्गदर्शन आणि सहकार्य अहवाल संपादनाच्या कामी मोलाचे ठरले. अहवालाच्या मुद्रितशोधनाचे काम डॉ. नंदकुमार मोरे यांनी अतिशय काळजीपूर्वक व आस्थेवाईकपणे केले. अहवाल डी.टी.पी. व छपाई काम शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय यांनी अगदी सुरेख व स्वच्छ केलेले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांनी या कामी वेळोवळी सहाय्य केले त्याबद्दल त्यांचाही आभारी आहे. हा अहवाल सिद्ध होण्यासाठी संपादन कार्यात सहकार्य लाभलेल्या सर्वांचा मी आभारी आहे.

प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे
प्राचार्य, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर

Estd. 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५६ वा
वार्षिक अहवाल

१ जुलै, २०१८ ते ३० जून, २०१९ या कार्यकालावधीमध्ये
शिवाजी विद्यापीठाच्या कार्याची माहिती देणारा हा अहवाल आहे.
सदरचा अहवाल विद्यापीठ अधिष्ठाता मंडळाच्या मार्गदर्शनाखाली
तयार केला असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६
मधील कलम १३६ (१) अन्वये अधिसभेस सादर करण्यात येत आहे.

■ अधिष्ठाता मंडळ

१.	**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू**	**अध्यक्ष**
२.	**प्रा. डॉ. पी. एस. पाटील** प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा	सदस्य
३.	**प्रा. डॉ. ए. एम. गुरव** प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा	सदस्य
४.	**प्रा. डॉ. (श्रीमती) भारती पाटील** प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा	सदस्य
५.	**प्रा. डॉ. पी. डी. राऊत** प्रभारी अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा	सदस्य
६.	**प्रा. डॉ. आर. के. कामत** संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य	सदस्य-सचिव

■ वार्षिक अहवाल समिती

१.	**प्राचार्य. (डॉ.) पी, आर. शेवाळे** डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर	**अध्यक्ष**
२.	**डॉ. रणधीर शिंदे** मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**सदस्य**
३.	**डॉ. एम. एस. देशमुख** अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**सदस्य**
४.	**डॉ. शोभा काळेबाग** महावीर महाविद्यालय, कोल्हापूर	**सदस्या**
५.	**डॉ. सतिश आर. घाटगे** काकासाहेब चव्हाण कॉलेज, तळमावले, ता. पाटण, जि. सातारा.	**सदस्य**
६.	**डॉ.नंदकुमार मोरे** मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**सदस्य**
७.	**डॉ. ए. एम. शेख** दि न्यू कॉलेज, कोल्हापूर	**सदस्य**
८.	**डॉ. श्रीमती आर. जी. बारवेकर** इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**सदस्या**

■ कार्यालयीन सहयोग

श्री. राठोड जी. एस.	**उपकुलसचिव**
श्री. सावगावे डी. डी.	**सहा. कुलसचिव**
श्री. शेख आर. आय.	**अधीक्षक**
श्री. पवार के. व्ही.	**कनिष्ठ सहायक**

■ मुद्रितशोधन

डॉ. नंदकुमार मोरे,	सहयोगी प्राध्यापक, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ प्रकाशक

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर	कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ संगणकीय अक्षर जुळवणी व मुद्रण

श्री. भूषण पाटील	अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय

अंतरंग

अ. न.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्रमांक
१.	विद्यापीठाचे पदाधिकारी	०४
२.	विद्यापीठाचे अधिकारी	०५
३.	विद्यापीठ अधिसभा सदस्य	०६
४.	विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य	११
५.	विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य	१३
६.	महत्त्वपूर्ण कार्यक्रम	१८
७.	व्याख्यानमाला	२२
८.	दीक्षांत समारंभ व विद्यापीठ वर्धापन दिन	२५
९.	शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती	२६
१०.	शिष्यवृत्ती अनुदान	२९
११.	प्रशासकीय विभागांचा अहवाल	३४
१२.	विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा	५१
१३.	क्रीडा मंडळ व संर्वधन मंडळ	५७
१४.	विद्यापीठ विद्यार्थी मंडळे, उपक्रम व युवा महोत्सव	६४
१५.	विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र	७५
१६.	निवडणुका व नियुक्त्या/ अभ्यासमंडळे	७८
१७.	विद्यापीठ अधिविभाग, अध्यासन व संशोधन केंद्र	९५
१८.	राष्ट्रीय सेवा योजना	१५२
१९.	बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र	१६२
२०.	विद्यापीठ वित्त व्यवस्था	१६८
२१.	विद्यापीठाचे उद्योगधंद्याशी संबंधित उपक्रम	१६९
२२.	केंद्र /महाराष्ट्र शासनाकडून मिळणाऱ्या सवलती / शिष्यवृत्ती	१७०
२३.	दीक्षान्त समारंभामध्ये प्रदान करण्यात आलेल्या पदवी, पदविका आणि प्रमाणपत्रे	१७१
२४.	प्रवास अनुदान प्राप्त शिक्षकांची माहिती	१७६
२५.	दूरशिक्षण विभाग	१७७
२६.	ऑक्टो./नोव्हें. २०१८ व मार्च/एप्रिल २०१९ परीक्षेस बसलेले विद्यार्थी	१८०
२७.	मार्च/एप्रिल २०१९ परीक्षामधील गुणानुक्रमे विद्यार्थी	१८५
२८.	पारितोषिके, पदके व शिष्यवृत्त्या	१९७
२९.	शिवाजी युनिव्हर्सिटी सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि.	२१८
३०.	संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था	२२०
३१.	महाविद्यालयांकडून प्राप्त झालेली माहिती	२७२
३२.	शिवाजी विद्यापीठ प्रकाशने	२८७
३३.	विद्यापीठ अनुदान मंडळाकडून संशोधन साहाय्य	२९२
३४.	अहवाल कालावधीमधील एम. फिल., पीएच. डी. नोंदणी झालेल्या व पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची व मान्यताप्राप्त मार्गदर्शकांची माहिती	२९५
३५.	विद्यापीठ अधिविभागातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची जाती-जमाती निहाय माहिती	३०५
३६.	विद्यापीठ कार्यालय दूरध्वनी क्रमांक	३१८

१. विद्यापीठाचे पदाधिकारी

✻ कुलपती	:	**मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव**
✻ कुलगुरू	:	**प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे**
✻ प्र-कुलगुरू	:	**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
✻ कुलसचिव	:	**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
✻ अधिष्ठाता	:	१. **प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील** प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा २. **प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव** प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ३. **प्रा. (डॉ.) (श्रीमती) भारती पाटील** प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा ४. **प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत** प्रभारी अधिष्ठाता, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
✻ संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ	:	**श्री. एम. ए. काकडे**
✻ वित्त व लेखाधिकारी	:	**श्री. व्ही. टी. पाटील**
✻ प्रभारी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळ	:	**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
✻ संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र	:	**डॉ. (श्रीमती) एन. बी. खोत**
✻ संचालक, विद्यार्थी विकास	:	**डॉ. आर. व्ही. गुरव**
✻ प्रभारी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना	:	**डॉ. डी. के. गायकवाड**

■■■

२. विद्यापीठाचे अधिकारी

उपकुलसचिव

१.	डॉ. जी. एस. कुलकर्णी	२.	डॉ. व्ही. एन. शिंदे
३.	डॉ. एन. पी. सोनजे (On Lien)	४.	श्रीमती व्ही. एल. अंत्रेडी
५.	श्री. एस. एम. कुबल	६.	श्री. जी. एस. राठोड
७.	डॉ. एन. जे. बनसोडे	८.	डॉ. पी. एस. पांडव
९.	श्री. जी. आर. पळसे	१०.	श्री. व्ही. एस. सोयम
११.	श्री. एम. पी. कदम	१२.	श्रीमती एस. एस. आडसुळे
१३.	श्री. एन. एम. आकुलवार	१४.	डॉ. व्ही. जे. ढेरे
१५.	श्रीमती बी. एम. नाळे	१६.	श्री. आर. वाय. लिधडे (On Deputation)

✻	विद्यापीठ कायदा अधिकारी	:	ॲड. (श्रीमती) ए. ए. कदम
✻	अंतर्गत हिशोब तपासणीस	:	श्री. ए. बी. चौगुले
✻	मुख्य लेखापाल	:	श्री. पी. बी. पेटकर
✻	जनसंपर्क अधिकारी	:	डॉ. ए. एन. जत्राटकर

सहायक कुलसचिव

१.	श्री. एन. एस. माने	२.	श्री. डी. डी. अडगळे
३.	श्री बी. एन. वाघमोडे	४.	डॉ. यु. के. सकट
५.	श्री. ए. जे. काटकर	६.	श्री. टी. के. कुंडले
७.	श्री. डी. डी. कवाळे	८.	श्री. डी. डी. सावगावे
९.	श्रीमती टी. एस. भुतकर	१०.	श्री. आर. एस. नागलबोने
११.	श्री. एस. एस. खराडे	१२.	डॉ. पी. बी. जाखले

✻	प्रभारी संचालक, संगणक केंद्र	:	श्रीमती एस. एस. खराडे
✻	सिस्टीम प्रोग्रॅमर, इंटरनेट युनिट	:	डॉ. एम. जे. जोशी
✻	नेटवर्क ॲडमिनीस्ट्रेटर	:	श्री. के. एस. देवरूखकर
✻	सिस्टीम प्रोग्रॅमर	:	श्री. एस. डी. हुक्केरी
✻	सिस्टीम प्रोग्रॅमर	:	श्री. ए. व्ही. घाटे
✻	उप अभियंता (विद्युत)	:	श्री. ए. सी. कांबळे
✻	वैद्यकीय अधिकारी	:	डॉ (श्रीमती) व्ही. ए. रानडे
✻	सांख्यिकी अधिकारी	:	श्री. ए. ए. रेडेकर

■■■

३. विद्यापीठ अधिसभा सदस्य

कुलपती – अध्यक्ष

१. **श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव**
मा. राज्यपाल तथा कुलपती,
शिवाजी विद्यापीठ,
राजभवन, वाळकेश्वर रोड,
मलबार हिल, मुंबई – ४०० ०३५.

२. **कुलगुरू**
प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३. **प्र–कुलगुरू**
प्रा. डॉ. डी. टी. शिर्के
प्र – कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्याशाखांचे अधिष्ठाता
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

४. **प्रा. डॉ. पी. एस. पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

५. **प्रा. डॉ. ए. एम. गुरव**
प्रभारी अधिष्ठाता,
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मानव विज्ञान विद्याशाखा

६. **डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

७. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

८. **श्री. एम. ए. काकडे**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वित्त व लेखा अधिकारी

९. **श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखाधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१० संचालक, विद्यापीठ उप–परिसर
रिक्त

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

११. डॉ. आर. के. कामत
प्रभारी संचालक,
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि.०३/०७/२०१८ पासून)

१२. संचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालकापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती
संचालक,
शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे.
किंवा
विभागीय सहसंचालक (उच्चशिक्षण)
कोल्हापूर विभाग,
राजाराम कॉलेज परिसर,
कोल्हापूर–४१६ ००४

१३. संचालक, तंत्र शिक्षण
किंवा
त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालकांपेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती
संचालक, तंत्र शिक्षण,
पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३,
महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल
बिल्डींग,
मुंबई – ४०० ००१.

संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र

१४. डॉ. श्रीमती नमिता बी. खोत
बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, विद्यार्थी विकास मंडळ

१५. डॉ. आर. व्ही. गुरव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण

१६. डॉ. पी. टी. गायकवाड
प्रभारी संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ

१७. डॉ. श्रीमती एस. के. बुवा
आजीवन अध्ययन आणि विस्तार अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य – १० जागा

१८. प्राचार्य डॉ. प्रविण नारायण चौगुले
डी. आर. माने महाविद्यालय,
कागल, जि. कोल्हापूर

१९. प्राचार्य डॉ. सुरेश शंकरराव गवळी
यशवंतराव चव्हाण कॉलेज (केएमसी),
कोल्हापूर

२०. प्राचार्य डॉ.लालासाहेब गणपती जाधव
वेणूताई चव्हाण कॉलेज,
विद्यानगर, कराड, जि. सातारा

२१. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे
भारती विद्यापीठाचे पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगली.

२२. प्राचार्य डॉ. मोहन मार्तंड राजमाने
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड, जि. सातारा

महिला प्राचार्या – १ जागा

२३. प्राचार्या डॉ. श्रीमती भाग्यश्री महादेव जाधव
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर, ता. कोरेगाव, जि. सातारा

राखीव प्राचार्य
१ जागा (एस.सी.)

२४. रिक्त
राखीव प्राचार्य
१ जागा (एस.टी.)

२५. रिक्त
राखीव प्राचार्य
१ जागा (डी. टी./एन.टी.)

२६. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर तुकाराम कारंडे
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि. सांगली.

राखीव प्राचार्य
१ जागा (ओबीसी)

२७. प्रा. डॉ. रमेश राजाराम कुंभार
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
तासगांव, जि. सांगली.

संस्था प्रतिनिधी – ४ जागा

२८. श्री. सतिश शंकरराव घाळी
संचालक, विद्या प्रसारक मंडळ,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

२९. श्री. प्रताप यशवंतराव माने
सचिव, दि कागल एज्युकेशन सोसायटी,
कागल, जि.कोल्हापूर

३०. ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील
सचिव, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी,
एस. डी. पाटील नगर,
उरुण – इस्लामपूर,
ता.वाळवा, जि. सांगली – ४१५ ४०९

३१. श्री. प्रताप बाजीराव पाटील
सचिव, श्री. वारणा शिक्षण संस्था,
ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि. सांगली.

महिला – १ जागा

३२. श्रीमती शुभांगी मुरलीधर गावडे
श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
२१३०, 'ई' वार्ड, ताराबाई पार्क,
कोल्हापूर

राखीव – १ जागा (एस.सी.)

३३. श्री. राजूबाबा जयवंतराव आवळे
२१/२३९, स्टेशन रोड, 'आवळे बिल्डींग' गंगानगर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष व सचिव

३४. अध्यक्ष
रिक्त

३५. सचिव
रिक्त

शिक्षक – खुला ५

३६. श्री. अशोककुमार बापूराव पाटील
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि.सांगली

३७. डॉ. अरुण आण्णासाहेब पाटील
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

३८. डॉ. मनोज दशरथ गुजर
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर, ता.कोरेगाव, जि.सातारा

३९. डॉ. सतिश रामचंद्र घाटगे
२, राजश्री अपार्टमेंट, २२८,
मंगळवार पेठ, जोतिबा मंदिराच्या मागे,
कराड, जि. सातारा – ४१५११०

४०. डॉ. व्ही. एम. पाटील
शांताबाई शेंडूरे महाविद्यालय,
हुपरी, जि.कोल्हापूर
(दि.१ डिसेंबर, २०१८ पर्यंत)
श्री. शिवाजी अनंत पाटील
जनार्दन रेसिडेन्सी, बनवडी कॉर्नर,
विद्यानगर, कराड, जि. सातारा
(दि.१४ मार्च, २०१९ पासून)

महिला शिक्षिका – १ जागा

४१. डॉ. श्रीमती इला देवचंद जोगी
'आशा-दीप', बी-३७, रुक्मीणीनगर-२,
कराड, जि. सातारा – ४१५ ११०

राखीव – (एस.सी.)
शिक्षक – १ जागा

४२. डॉ. निलकंठ काशिनाथ खंदारे
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,
वाळवा, जि.सांगली

राखीव – (एस.टी.)
शिक्षक – १ जागा

४३. डॉ. श्रीमती अलका देविदास निकम
विलिंग्डन कॉलेज, सांगली

राखीव – (डी. टी./एन. टी.)
शिक्षक – १ जागा

४४. डॉ. राजेंद्र रामचंद्र थोरात
वेणुताई चव्हाण महाविद्यालय,
कराड, जि.सातारा

राखीव – (ओबीसी)
शिक्षक – १ जागा

४५. श्री. प्रकाश गणपत कुंभार
म. ह. शिंदे महाविद्यालय,
तिसंगी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

विद्यापीठ शिक्षक – ३
खुला – १ जागा

४६. डॉ. एस. डी. डेळेकर
रसायनशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राखीव (महिला) – १ जागा

४७. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राखीव (एस.सी.) – १ जागा

४८. डॉ. एन. बी. गायकवाड
वनस्पतिशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

नोंदणीकृत पदवीधर – १० जागा

खुला – ५ जागा

४९. श्री. संजय पांडुरंग जाधव
प्लॉट नं. ४३, आर.एस.नं.५९३/१-२,
अजिंक्यतारा कॉलनी, कसबा बावडा, कोल्हापूर

५०. श्री. मल्लाप्पा लग्माण्णा चौगुले
अयोध्यानगर, दुसरी गल्ली,
गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

५१. श्री. पंकज पद्मचंद मेहता
१०/६५, श्रीनाथ अपार्टमेंट्स,
धान्य गल्ली, इचलकरंजी,
जि.कोल्हापूर

५२. श्री. मधुकर मुकुंद पाटील
मु. जैताळ, पो. कामडगाव,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

५३. श्री. श्रीनिवास बाळासाहेब गायकवाड
१३३/२, प्लॉट नं. २५,
विजय कॉलनी, गव्हर्नर कॉलनीच्या पूर्वेस,
विश्रामबाग, सांगली – ४१६४१६.

राखीव जागा

महिला – १ जागा

५४. श्रीमती आरती प्रभाकर शिंदे
१७४८, 'डी' वॉर्ड, कद्रे गल्ली,
शुक्रवार पेठ, कोल्हापूर

अनुसूचित जाती – १ जागा

५५. श्रीमती स्वाती विनोद पंडित
घ.नं. २९२१, 'सी' वॉर्ड, सिद्धार्थनगर,
जुना बुधवार पेठ, कोल्हापूर-४१६००२

अनुसूचित जमाती – १ जागा

५६. श्री. लोभाजी तातेराव भिसे
मु.पो. हेर्ले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)
किंवा भटक्या जमाती – १ जागा

५७. श्री. ए. सी. रजपूत
विसावा धाबा, दत्त कॉलनी,
सांगाव रोड, कागल, जि.कोल्हापूर

इतर मागासवर्गीय – १ जागा

५८. श्री. दिनेश गंगाधर जंगम
८, गिरिदर्शन कॉलनी, विलासपूर,
सातारा – ४१५००४

कुलपतींनी नामनिर्देशित केलेले सदस्य – १० जागा

५९. ॲड. जगदीश पाटणे
४६७, गणपती गल्ली,
वाई, जि. सातारा

६०. श्री. संजय परमाणे
सिद्धेश्वर बंगलो, विकास चौक,
इन्कमटॅक्स ऑफिसजवळ,
शिवाजीनगर दक्षिण,
सांगली – ४१६४१६

६१. श्री. नंदकुमार दिवटे
७६१/२०, 'ए' वॉर्ड, 'यशोधन',
न्यू मोरे कॉलनी, संभाजीनगर बस
स्टँडजवळ, कोल्हापूर

६२. श्री. अजितकुमार बी. पाटील
'रत्नत्रय', १३३० ए, ९-ए सागरमाळ,
प्रतिभानगर रोड, कोल्हापूर-४१६००८

६३. श्रीमती नसिमा हुरजूक
२३३/६, 'इ' वॉर्ड, आत्माराम अपार्टमेंट,
जनरल थोरात मार्ग, हिंदनगर सोसायटीसमोर,
ताराबाई पार्क, कोल्हापूर

६४. श्री. एस. जी. कुलकर्णी
'राधेय' ६४८/४७, 'बी' वॉर्ड,
मंडलिक वसाहत,
मंगळवार पेठ, कोल्हापूर

६५. श्री. यशवंत भालकर
'लक्षरत्न' १४२२, सनगर गल्ली,
मंगळवार पेठ, कोल्हापूर
(दि.१९/१२/२०१८ पर्यंत)

६६. डॉ. शरद काळे
बी २०/०/२, सेक्टर ११,
केंद्रीय विहार, खारघर,
नवी मुंबई – ४१०२०१

६७. श्री. प्रताप चिपळूणकर
७४३, तिसरी गल्ली, शाहूपुरी,
सुभाष फोटो स्टुडिओसमोर, कोल्हापूर

६८. श्री. अनिल ज्ञानदेव चौगुले
२८२१/४८, 'बी' वॉर्ड,
महालक्ष्मी नगर, कोल्हापूर

कुलगुरूंनी नामनिर्देशित केलेले विद्यापीठ अध्यापकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयीन अध्यापकेतर कर्मचारी सदस्य

६९. श्री. राम तुपे
जनरल वर्क्स सेक्शन,
रूम नं. १०३,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. ०१/०३/२०१९ पासून)

७०. श्री. महेश बाबुराव निलजे
श्री. विजयसिंह यादव आर्ट्स अँड
सायन्स कॉलेज, पेठ वडगाव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
(दि.०१/०३/२०१९ पासून)

विधान सभा सदस्य – २ जागा

७१. श्री. अमल महाडिक
'सुस्वयम' शिरोली (पुलाची),
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

७२. श्री. चंद्रदीप नरके
'चंद्रदिप' ११८७, 'ए' वॉर्ड,
शिवाजी पेठ, कोल्हापूर

विधान परिषद सदस्य – १ जागा

७३. श्री. दत्तात्रय अच्युतराव सावंत
मु./पो. अंबे,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

कुलगुरू नामनिर्देशित

नगरपरिषद किंवा महानगरपालिका सदस्य – १ जागा

७४. ॲड. दत्तात्रय गणपत बनकर
प्लॉट नं. ९, 'बी' महारूद्र कॉलनी,
सातारा-रहिमतपूर रोड, हॉटेल लेक व्ह्यू,
गोडोली, जि.सातारा - ४१५००१
(दि. ३१/०८/२०१८ पर्यंत)

श्री. अशोक सखाराम जाधव
चौगुले गल्ली, कसबा बावडा,
कोल्हापूर.
(दि. १७/११/२०१८ पासून)

जिल्हा परिषद शिक्षण समितीचा प्रतिनिधी – १ जागा

७५. ॲड. श्रीमती शांता कनुंजे
मु./पो. तडसर,
ता. कडेगाव, जि. सांगली.
(दि. ३१/०८/२०१८ पर्यंत)

सदस्य सचिव

७६. डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.

■■■

४. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य

कुलगुरू : अध्यक्ष

१. **प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३. **प्र-कुलगुरू**
प्रा. डॉ. डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

३. **मा. कुलपती नामनिर्देशित-एक**
श्री.अमित कुलकर्णी
श्रीनिधी, वरद विनायक हौसिंग
सोसायटी, गेंडामाळ जकात नाका चौक,
शाहूपुरी, सातारा - ४१५ ००१.

४. **अधिष्ठाता-दोन**
प्रा. डॉ. पी. एस. पाटील
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

५. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठ विभाग प्रमुख किंवा संचालक-एक

६. **डॉ. डी. एन. काशिद**
संख्याशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. ३१/०१/२०१९ पर्यंत)
डॉ. ए. एम. सरवदे
इंग्रजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. ०१/०३/२०१९ पासून)

प्राचार्य (अधिसभेतून) - दोन

७. **प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे**
भारती विद्यापीठाचे
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगलीवाडी, सांगली.

८. **प्राचार्य डॉ. चंद्रशेखर तुकाराम कारंडे**
मिरज महाविद्यालय,
मिरज, जि. सांगली.

शिक्षक (अधिसभेतून)-दोन

९. **डॉ. एन. बी. गायकवाड**
वनस्पतिशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१०. **श्री. प्रकाश गणपत कुंभार**
म. ह. शिंदे महाविद्यालय,
तिसंगी,
ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर

संस्था प्रतिनिधी (अधिसभेतून)-दोन

११. **ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील**
सचिव, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी,
एस. डी. पाटील नगर,
उरुण-इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली - ४१५ ४०९

१२. **श्री. राजूबाबा जयवंतराव आवळे**
२१/२३९, स्टेशन रोड,
'आवळे बिल्डींग' गंगानगर,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर

पदवीधर (अधिसभेतून) - दोन

१३. **श्री. संजय पांडुरंग जाधव**
प्लॉट नं. ४३, आर.एस.नं. ५९३/१-२,
अजिंक्यतारा कॉलनी, कसबा बावडा,
कोल्हापूर

१४. **श्री. लोभाजी तातेराव भिसे**
मु./पो. - हेर्ले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

विद्यापरिषदेतून दोन व्यक्ती
(एक महिला)

१५. डॉ. रसूल गफूर कोरबू
आरएसएन- १४/३/१, प्लॉट नं. ३,
जुना नाकाजवळ, शिवराय कॉलनी,
कसबा बावडा, कोल्हापूर-४१६००६

१६. डॉ.श्रीमती भारती तुकाराम पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरू नामनिर्देशित-एक

१७. प्रा. डॉ. विवेक खानझोडे
नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग
(NITIE), विहार लेक,
पोवई, मुंबई - ४०००८७

सचिव, उच्च शिक्षण, किंवा त्यांनी नामनिर्देशन केलेली उपसचिव किंवा सह संचालक, उच्च शिक्षण या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती

१८. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई -४०० ०३२.

१९. संचालक, उच्च शिक्षण किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली सहसंचालकापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती
संचालक,
शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे.
किंवा
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)
कोल्हापूर विभाग, राजाराम कॉलेज परिसर,
कोल्हापूर-४१६ ००४

२०. संचालक, तंत्र शिक्षण,
किंवा
त्यांनी नामनिर्देशिन केलेली सहसंचालक, तंत्र शिक्षण यापदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी व्यक्ती
संचालक, तंत्र शिक्षण,
पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३,
महापालिका मार्ग,
एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल बिल्डींग,
मुंबई - ४०० ००१.

सचिव

२१. डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.

निमंत्रित -

२२. श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखाधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२३. श्री. महेश काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■■■

५. विद्यापीठ विद्यापरिषद सदस्य

कुलगुरू – अध्यक्ष

१. **प्रा. डॉ. देवानंद बी. शिंदे**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

२. **प्र-कुलगुरू**
प्रा. डॉ. डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

विद्याशाखांचे अधिष्ठाता

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

३. **प्रा. डॉ. पी. एस. पाटील**
प्रभारी अधिष्ठाता,
स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड
टेक्नॉलॉजी अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

४. **डॉ. एस. एच. सावंत**
प्रभारी सहयोगी अधिष्ठाता,
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
डॉ.जे.जे.मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
जयसिंगपूर, जि.कोल्हापूर
(दि.२९/०४/२०१९ पासून)

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

५. **प्रा. डॉ. ए. एम. गुरव**
प्रभारी अधिष्ठाता,
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मानव्य विज्ञान विद्याशाखा

६. **डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

७. **प्रा. डॉ. पी. डी. राऊत**
प्रभारी अधिष्ठाता,
पर्यावरणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संचालक, उपपरिसर

८. रिक्त

संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ

९. **डॉ. आर. के. कामत**
प्रभारी संचालक,
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
(दि. ०३/०७/२०१८ पासून)

कुलगुरू नामनिर्देशित प्राचार्य-(८ जागा)

१०. **प्राचार्य डॉ. एस. वाय. होणगेकर**
विवेकानंद महाविद्यालय,
कोल्हापूर

११. **प्राचार्य डॉ. युवराज बंडू गोंडे**
शंकरराव जगताप आर्ट्स आणि कॉमर्स कॉलेज,
वाघोली, जि. सातारा

१२. **प्राचार्य डॉ. यु. आर. माने-पाटील**
एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय,
मिरज, जि. सांगली

१३. **प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले**
दत्ताजीराव कदम टेक्स्टाईल
अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर

१४. **प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील**
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक
आर्ट्स आणि सायन्स कॉलेज,
चिखली, ता. शिराळा, जि. सांगली

१५. **प्राचार्य डॉ. श्रीमती मेघा गुळवणी**
मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे
कॉलेज ऑफ एज्युकेशन,
विटा, जि. सांगली

१६. प्राचार्य डॉ. श्रीमती प्रतिभा गायकवाड
धनंजयराव गाडगीळ कॉलेज
ऑफ कॉमर्स, सातारा
१७. प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे
राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय,
कदमवाडी रोड, कोल्हापूर

कुलगुरू नामनिर्देशित
२ विद्यापीठ अध्यापक
१८. डॉ. श्रीमती जे. पी. जाधव
जैवतंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
१९. रिक्त

कुलगुरू नामनिर्देशित
१ संस्था प्रमुख
२०. रिक्त
विद्याशाखेचे प्रतिनिधी
दोन शिक्षक
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
खुला
२१. डॉ. दिलीप हणुमंत दगडे
रसायनशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
राखीव (एस.सी.)
२२. डॉ. प्रमोद निवृत्ती वासंबेकर
इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
खुला
२३. डॉ. रसूल गफूर कोरबू
आरएसएन - १४/३/१, प्लॉट नं.३,
जुना नाकाजवळ, शिवराय कॉलनी,
कसबा बावडा, कोल्हापूर
राखीव (एस.टी.)
२४. रिक्त

मानव्य विज्ञान विद्याशाखा
खुला
२५. डॉ. सुनील रघुनाथ सावंत
किसनवीर महाविद्यालय,
वाई, जि.सातारा
राखीव (डी.टी./एन.टी.)(महिला)
२६. डॉ. श्रीमती शर्मिला अशोक साबळे
राजर्षी शाहू आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
खुला
२७. डॉ.श्रीमती प्रतिभा सुभाषचंद्र पाटणकर
शिक्षणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राखीव (ओबीसी)
२८. रिक्त
अधिसभा नामनिर्देशित
एक व्यवस्थापन प्रतिनिधी
२९. श्री. प्रताप यशवंतराव माने
सचिव, दि कागल एज्युकेशन सोसायटी,
कागल, जि.कोल्हापूर
कुलपती नामनिर्देशित
आठ मान्यवर तज्ञ
३०. प्रा. रघुराम राव
संचालक, नॅशनल इन्सिटट्यूट ऑफ
फार्मास्युटीकल एज्युकेशन अँड
रिसर्च (NIPER), सेक्टर-६७,
फेज - १०, एस. ए. एस. नगर,
मोहाली - १६० ०६२, पंजाब
३१. प्रा. के. एन. गणेश
संचालक, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ
सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER),
मेन बिल्डींग, पाषाण, पुणे-४११ ००८.
३२. डॉ. अनिल कौल
संचालक, इन्स्टिट्यूट ऑफ मायक्रोबायल
टेक्नॉलॉजी कॉन्सिल ऑफ साईंटीफिक
अँड इंडस्ट्रियल रिसर्च (GOI),
सेक्टर-३९, चंदिगढ-१६० ०३६.

३३. डॉ. लक्ष्मी नारायण
प्रोजेक्ट डायरेक्टर,
एस्रो सॅटेलाईट सेंटर (ISAC),
जुने विमानतळ रोड, विमानपुरा पोस्ट,
बेंगलुरू – ५६००१७, कर्नाटक

३४. सीएस मकरंद लेले
कंपनी सचिव,
एम.आर.एम. असोसिएट्स,
पहिला मजला, ज्ञानसुधा अपार्टमेंट्स,
७७, विजयनगर कॉलनी, २१४७,
सदाशिवपेठ, पुणे-४११०३०.

३५. श्री. अशोक गिरी
प्रिन्सिपल सायंटीस्ट,
CSIR – नॅशनल केमिकल लॅबोरेटरी,
(Council of Science and Industrial Research)
पुणे – ४११ ००८.

३६. श्री. अदिले सुमरिवाला
अध्यक्ष,
ॲथलेटिक फेडरेशन ऑफ इंडिया,
WG.114G, पहिला मजला,
तोडापूर विलेज, तोडापूर मुख्य रस्ता,
डी. पी. शास्त्री मार्ग,
नवी दिल्ली-११००१२.

३७. रिक्त

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशी, त्यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ती

३८. संचालक,
शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण),
सेंट्रल बिल्डींग, पुणे.

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती –

३९. संचालक, तंत्रशिक्षण
पोस्ट बॉक्स नं.१९६७, ३, महापालिका मार्ग,
एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल
बिल्डिंग, मुंबई-४०० ००१.

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

४०. श्री. एम. ए. काकडे
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४.

अभ्यास मंडळांचे अध्यक्ष

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

अध्यक्ष, गणित अभ्यास मंडळ

४१. प्रा. डॉ. श्रीमती एस. एच. ठकार
गणित अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, संख्याशास्त्र अभ्यास मंडळ

४२. प्रा. डॉ. डी. एन. काशिद
संख्याशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष,पदार्थ विज्ञान अभ्यास मंडळ

४३. प्रा. डॉ. पी. एस. पाटील
पदार्थ विज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, केमिस्ट्री अँड केमिस्ट्री इंजिनिअरिंग अभ्यास मंडळ

४४. प्रा. डॉ. जी. एस. गोकावी
रसायनशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ

४५. डॉ. अख्तर मुहम्मद शेख
दि न्यू कॉलेज,
शिवाजी पेठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, वनस्पतिशास्त्र अभ्यास मंडळ

४६. प्रा. डॉ. डी. के. गायकवाड
वनस्पतिशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
(दि. ३१/०५/२०१९ पर्यंत)

अध्यक्ष, प्राणीशास्त्र अभ्यास मंडळ

४७. रिक्त

अध्यक्ष, सूक्ष्मजीवशास्त्र अभ्यास मंडळ

४८. **रिक्त**

अध्यक्ष, जैवरसायनशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अभ्यास मंडळ

४९. **रिक्त**

अध्यक्ष, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ

५०. **रिक्त**

अध्यक्ष, पर्यावरणशास्त्र विज्ञान व पर्यावरणशास्त्र अभियांत्रिकी अभ्यास मंडळ

५१. **रिक्त**

अध्यक्ष, भूगोल व भूगर्भशास्त्र अभ्यास मंडळ

५२. **डॉ. संभाजी डी. शिंदे**
भूगोल अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अध्यक्ष, संगणक विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यास मंडळ

५३. **रिक्त**

अध्यक्ष, सिव्हिल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ

५४. **रिक्त**

अध्यक्ष, मेकॅनिकल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ

५५. **डॉ. ए. टी. पिसे**
गव्हर्मेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,
कराड, जि. सातारा

अध्यक्ष, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ

५६. **रिक्त**

अध्यक्ष, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळ –

५७. **रिक्त**

अध्यक्ष, आर्किटेक्चर इंजिनिअरिंग अभ्यास मंडळ

५८. **रिक्त.**

अध्यक्ष, फार्मसी अभ्यास मंडळ

५९. **डॉ. हरिनाथ निवृत्ती मोरे**
भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसी, मोरेवाडी, कोल्हापूर

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

अध्यक्ष, वाणिज्य अभ्यास मंडळ

६०. **प्रा. ए. एम. गुरव**
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, व्यवस्थापन अभ्यास मंडळ

६१. **डॉ. सारंग शंकर भोला**
कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् अँड रिसर्च,
वर्ये, सातारा

अध्यक्ष, अकौंटन्सी अभ्यास मंडळ

६२. **प्रा. एस. एस. महाजन**
वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

अध्यक्ष, बिझनेस इकॉनॉमिक्स अभ्यास मंडळ

६३. **डॉ. डी. के. मोरे**
के. ई. एस. के. आर. पी. कन्या महाविद्यालय,
उरुण-इस्लामपूर, जि. सांगली

मानव्य विज्ञान विद्याशाखा

अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ

६४. **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

अध्यक्ष, हिंदी अभ्यास मंडळ

६५. **डॉ. राजेंद्र पिलोबा भोसले**
आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज,
पुसेगाव, जि. सातारा

अध्यक्ष,
इंग्रजी आणि भाषाशास्त्र अभ्यास मंडळ
६६. रिक्त

अध्यक्ष,
मॉडर्न फॉरेन लँग्वेजीस अदर दॅन इंग्लीश अभ्यास मंडळ
६७. रिक्त

अर्थशास्त्र अभ्यास मंडळ
६८. डॉ. अनिलकुमार के. वावरे
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ
६९. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अध्यक्ष, इतिहास अभ्यास मंडळ
७०. डॉ. अवनिश पाटील
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यास मंडळ
७१. रिक्त
अध्यक्ष, मानसशास्त्र अभ्यास मंडळ
७२. रिक्त
अध्यक्ष, तर्कशास्त्र अभ्यास मंडळ
७३. रिक्त
अध्यक्ष, एन. सी. सी. अँड
एन. एस. एस. अभ्यास मंडळ
७४. रिक्त
अध्यक्ष, विधी अभ्यास मंडळ

७५. रिक्त
आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
अध्यक्ष, शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ
७६. डॉ. श्रीमती एस. व्ही. काळेबाग
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
अध्यक्ष, शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ
७७. रिक्त
अध्यक्ष, होम सायन्स अभ्यास मंडळ
७८. रिक्त
अध्यक्ष, लायब्ररी अँड इन्फॉर्मेशन सायन्स अभ्यास मंडळ
७९. रिक्त
अध्यक्ष, जर्नेलिसम अँड मास कम्युनिकेशन अभ्यास मंडळ
८०. रिक्त
अध्यक्ष, सोशल वर्क अँड अलाईड सब्जेक्ट्स अभ्यास मंडळ
८१. रिक्त
अध्यक्ष, व्होकेशनल एज्युकेशन अभ्यास मंडळ
८२. रिक्त
अध्यक्ष, परफॉर्मिंग अँड फाईन आर्ट्स अभ्यास मंडळ
८३. रिक्त

सदस्य सचिव
८४. डॉ. विलास डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४

■■■

६. महत्वपूर्ण कार्यक्रम

विविध मान्यवरांनी विद्यापीठास दिलेल्या भेटी

१. दिनांक १ जुलै, २०१८ रोजी विद्यापीठात शासनाच्या वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत शिवाजी विद्यापीठ, वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात १३००० वृक्षलागवडीच्या संकल्पाचा प्रारंभ महसूल मंत्री तथा पालक मंत्री मा. नामदार श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

याप्रसंगी कुलगुरू, प्र-कुलगुरू यांच्यासह जिल्हाधिकारी श्री. अविनाश सुभेदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार, मुख्य वनसंरक्षक श्री. अरविंद पाटील, उपवनसंरक्षक श्री. प्रभुनाथ शुक्ल, कुलसचिव, शैक्षणिक सल्लागार, वित्त व लेखाधिकारी, यांचेसह शासकीय अधिकारी, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

२. दिनांक १८ ते २१ जुलै, २०१८ या कालावधीत तैवानच्या राष्ट्रीय त्सिंग हुआ विद्यापीठांतील शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रो. हंग यू ओ, प्रो. सर्हायन हसिबग यूई यांनी शिवाजी विद्यापीठास भेट दिली. या दरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठ आणि परिक्षेत्रातील विविध क्रीडा सुविधांची पाहणी केली. तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रातील क्रीडा शिक्षकांशी संवाद साधला व इंटरनॅशनल वर्कशॉपमध्ये सहभाग घेतला.

३. दिनांक ४ ऑगस्ट, २०१८ रोजी विद्यापीठात भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्ताने 'भौगोलिक माहिती प्रणालीच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापन' एकदिवसीय आतंरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रसंगी अमेरिकेतील पर्डयू युनिव्हर्सिटी येथील प्रा. व्यंकटेश मेरवाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

४. दिनांक १८ नोव्हेंबर, २०१८ रोजी विद्यापीठाचा ५६ वा वर्धापन दिन संपन्न झाला. सदर समारंभास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. पी. पी. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रथम ध्वजारोहण कार्यक्रम व त्यानंतर शाहू सिनेट सभागृह येथे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना गौरविण्यात आले. तसेच विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या गुणवत्ता प्राप्त पाल्यांना विद्यापीठातर्फे व कर्मचारी कल्याण निधीच्या वतीने पारितोषिके प्रदान करण्यात आली.

याचबरोबर 'प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार' या योजनेअंतर्गत गुणवत्ताप्राप्त संबंधित कार्यालयीन व पदव्युत्तर अधिविभागांना गुणानुक्रमे पारितोषिके देण्यात आली. यावेळी नॅकमार्फत 'अ' प्लस व 'अ' मानांकन मिळालेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उत्कृष्ट पदव्युत्तर अधिविभागासाठीचा पहिला पुरस्कार पदार्थविज्ञान अधिविभागास देऊन गौरविण्यात आले.

५. दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. राज्यपाल तथा कुलपती श्री. चे. विद्यासागर राव यांच्या हस्ते विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीचा भूमीपूजन समारंभ संपन्न झाला.

६. दि. २२ फेब्रुवारी २०१९ रोजी शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ संपन्न झाला. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा कुलपती श्री. चे. विद्यासागर राव यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवले तर मा. श्री. भीमराया मेत्री, संचालक, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, तिरुचिरापल्ली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर समारंभात मा. राज्यपाल यांच्या हस्ते श्री. सत्यजित संजय पाटील यांना 'राष्ट्रपती सुवर्णपदक' देऊन व श्रीमती साक्षी शिवाजी गावडे यांना 'कुलपती पदक' देऊन गौरविण्यात आले.

७. दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी मा. प्रा. (डॉ.) भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी विद्यापीठास भेट दिली. यावेळी अधिविभाग प्रमुख/संचालक, विद्यापीठ पदवी व पदव्युत्तर अधिविभाग यांचेसाठी 'शैक्षणिक धोरण संदर्भात मागदर्शन' आयोजित करण्यात आले होते. तसेच कुलपती नारळ उद्यान येथे वृक्षारोपण आणि उद्यानाचे उद्घाटन करण्यात आले.

मा. कुलगुरूंची विविध समित्यांवर नियुक्ती

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या दिनांक ३० ऑगस्ट २०१८ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठाच्या मानांकन उंचावण्याकरिता व्यावसायिक संस्थेची निवड करण्याकरिता कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीवर मा. कुलगुरूंची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. मा. कुलपतींचे सचिव, राजभवन, मुंबई यांच्या पत्रान्वये मा. कुलगुरूंची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलसचिव, जळगांव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ पदांच्या निवड समितीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, २०१६ कलम १०५ (२) (सी) नुसार मा. कुलपती नियुक्त सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी मुंबई येथे इंदिरा नॉलेज वर्ल्ड युनिव्हर्सिटी, पुणे या विद्यापीठाच्या प्रस्तावावर चर्चेसाठी मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित छाननी समितीच्या बैठकीसाठी कुलगुरू उपस्थित होते.

४. यु.जी.सी., नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ मे, २०१९ च्या पत्रान्वये उच्च शिक्षण गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत प्रा. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या U.G.C. STRIDE Advisory Committee वर सदस्य (Member) म्हणून कुलगुरूंची नियुक्ती केली आहे.

५. दिनांक ३ जून, २०१९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने Institute of Democracy and Election for Good Governance (IDEGG) या संस्थेची स्थापना केली असून सदर संस्थेची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० अंतर्गत करण्यात येवून काही विद्यापीठे व स्वयंसेवी संस्थांना संस्थापक सदस्य म्हणून नेमण्यात आले असून यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. तसेच सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर (DEGG Management Committee) कुलगुरूंची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

६. मा. राज्यपाल तथा कुलपती यांच्या दिनांक ३ जून, २०१९ च्या आदेशान्वये कुलगुरूंनी दिनांक ४ जून, २०१९ पासून औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून कार्यभार स्वीकारला.

महत्त्वाच्या घडामोडी

१. शिवाजी विद्यापीठाने जलव्यवस्थापनामध्ये महत्वाचा टप्पा गाठला आहे. विद्यापीठ परिसरात राजाराम तलावाव्यतिरिक्त ३० कोटी लिटर भृपृष्ठावरील पाणी साठवले जाते. विद्यापीठ यावर्षी पाण्याबाबत पूर्णत: स्वयंपूर्ण झाले आहे.

२. **शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती**

सन २०१७-१८ या वर्षामध्ये एकूण ६२७ विद्यार्थ्यांना रूपये ४३,७५,०००/- इ. रकमेची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

दि. ४ सप्टेंबर, २०१८ रोजी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र या पाच विद्याशाखांमधील सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणाऱ्या शहरी, निमशहरी व ग्रामीण या गटातून सर्वप्रथम आलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

३. World Q.S. University Ranking च्यावतीने ब्रिक्स (ब्राझिल, रशिया, भारत चीन आणि दक्षिण आफ्रिका) देशासाठी ठरविण्यात आलेल्या रॅकिंग संदर्भात यंदा प्रथमच भारतातील शैक्षणिक संस्थासाठी स्वतंत्रपणे क्रमवारी जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये भारतातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० तर ब्रिक्स देशातील शैक्षणिक संस्थामध्ये ही क्रमवारी २५१-२६० अशी आहे. यातील संशोधनासाठी निगडित निकषांवर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर व्दितीय स्थान मिळवून संशोधनाची विद्यापीठाची गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्या सन्मानार्थ दि.१५ ऑक्टोबर,

२०१८ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या समारंभामध्ये नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. राजीव कुमार व क्यु.एस.वर्ल्ड रॅकिंगचे उपाध्यक्ष जेसन न्यूमन यांचे शुभ हस्ते कुलगुरू प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे यांना गौरविण्यात आले आहे. यावेळी नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे प्र. संचालक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. (डॉ.) आर. के. कामत उपस्थित होते.

४. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने, दि. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर, २०१८ या कालावधीत युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार यांचे क्षेत्रीय कार्यालय, पुणे व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचे उद्घाटन कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक श्री अभिनव देशमुख यांच्या हस्ते झाले. समारोप प्रसंगी कोल्हापूरचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. संजय शिंदे उपस्थित होते. सदर शिबिरामध्ये महाराष्ट्र व इतर राज्यातील विद्यापीठांचे २१० शिबिरार्थी सहभागी झालेले होते.

५. दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ रोजी विद्यापीठातील भाषाभवन सभागृहात शाहू संशोधन केंद्राच्या वतीने 'राजर्षी शाहू साहित्यमाला' अंतर्गत प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या 'SHIVAJI THE GREAT' (Vol.I,II,III & IV)' या महाग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी श्री शाहू छत्रपती महाराज, करवीर हे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू होते.

६. भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ व २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी विद्यापीठात तिसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आठ संघांपैकी चार संघ महाराष्ट्रातील असून हरयाणा, पंजाब, राजस्थान व मध्यप्रदेश या राज्यांमधून प्रत्येकी एका संघाने सहभाग घेतला. सदर स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळविले. मुंबई विद्यापीठास सहविजेते म्हणून गौरविण्यात आले.

७. दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ व जिल्हा चर्मवस्तु उत्पादक, कोल्हापुरी चप्पल क्लस्टर प्रा. लि., कोल्हापूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत कोल्हापूरी चप्पलचा दर्जा गुणवत्ता व टिकाऊपणा वृध्दिंगत करण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे.

दिनांक ११ जुलै, २०१९ रोजी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ व कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. विद्यापीठातर्फे कुलसचिव आणि कोल्हापुरी चप्पल क्लस्टर समूह यांच्या वतीने श्री अरूण सातपुते यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या अंतर्गत संशोधन, तंत्रज्ञान विकास, पणन व व्यवस्थापन आणि कौशल्य निर्मिती या चार आघाड्यांवर विद्यापीठ सक्रियपणे मदत करणार आहे.

८. दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी विद्यापीठात केंद्रीय संसदीय कामकाज मंत्रालयाच्या मान्यतेने १५ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार श्री. धनंजय महाडिक व तज्ज्ञ परिक्षक म्हणून प्रा. तरूण अरोरा, पंजाब सेंट्रल युनिव्हर्सिटी, बठींडा व डॉ. वैशाली पवार, पुणे उपस्थित होते.

९. दि. ७ व ८ डिसेंबर, २०१८ रोजी विद्यापीठात वनस्पतिशास्त्र अधिविभाग, संगणकशास्त्र अधिविभाग, युसिक विभाग, श्री. यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय, सोळांकूर, जि. कोल्हापूर व दि न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'मटेरियल्स व एन्व्हायर्नमेंट सायन्सेस' या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परिषदेस कॅनडासह ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेपाळ, तैवान, श्रीलंका, सौदी अरेबिया इ. देशातील संशोधक सहभागी झाले असून सुमारे ३१० शोधनिबंध प्राप्त झाले आहेत.

१०. दिनांक १२ जानेवारी, २०१९ रोजी विद्यापीठात लोककला केंद्र येथे मा खासदार तथा माजी केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते ज्येष्ठ विचारवंत प्रा. (डॉ.) एन. डी. पाटील यांना या वर्षीचा प्राचार्य आर. के. कणबरकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

११. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा, 2016 Section 93 (1) (a) नुसार दिनांक १७ जानेवारी, २०१९ रोजी भारत फोर्ज लि., पुणे येथे सल्लागार समितीचे अध्यक्ष, उद्योगपती श्री बाबा कल्याणी यांचे अध्यक्षतेखाली सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस सल्लागार समितीचे सदस्य प्रा. जी.डी. यादव, मुंबई, डॉ. महेश कुलकर्णी, पुणे व कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, आय.क्यु.ए.सी. उपस्थित होते.

१२. पदवी प्रदान समारंभाच्या अनुषंगाने दिनांक २१ व २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी विद्यापीठात ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक नामवंत प्रकाशकांचा सहभाग असलेल्या पुस्तकांचे स्टॉल ग्रंथ महोत्सवात उभारण्यात आले होते. तसेच दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी कमला कॉलेज ते विद्यापीठ या मार्गावर ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

१३. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी विद्यापीठातील भाषाभवन सभागृहामध्ये महाराष्ट्र शासन आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'बोलू कवतिके' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

१४. शिवाजी विद्यापीठास सन १९६४ ते २०१८ अखेरपर्यन्त सादर झालेले एकूण ३४९६ शोधप्रबंध इन्लिबनेटच्या '**शोधगंगा**' या राष्ट्रीय रिपॉझिटरी पोर्टलवर उपलब्ध झाले आहेत. त्याचा नवसंशोधकांना संदर्भ साहित्य म्हणून मोलाचा उपयोग होणार आहे. राज्यात अशा प्रकारे सर्व शोधप्रबंध अपलोड करणारे शिवाजी विद्यापीठ हे तिसरे विद्यापीठ आहे. सदर पोर्टलचा लोकार्पण सोहळा दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी करण्यात आले.

१५. दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी विद्यापीठात शिवाजी विद्यापीठ आणि सी.एस.आय.आर. एन.सी.एल., पुणे संयुक्त प्रकल्प व संशोधन विषयक सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाच्या वतीने प्रभारी कुलसचिव व एन.सी.एल., पुणे या संस्थेच्यावतीने मुख्य शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगांवकर यांनी करारावर सह्या केल्या.

१६. दिनांक २१ जून, २०१९ रोजी सकाळी ६.०० ते ९.०० या वेळेत राजमाता जिजाऊ बहुउद्देशिय सभागृह येथे श्री क्षेत्र सिद्धगिरी कणेरी मठ, टाईम्स ऑफ इंडिया ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने ५ वा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर योग दिन कार्यक्रमास अधिकारी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

■■■

७. व्याख्यानमाला

सन २०१८-२०१९ च्या वार्षिक अहवालाकरिता १ जुलै २०१८ ते ३० जून २०१९ या कालावधीमध्ये झालेल्या व्याख्यानमालांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	व्याख्यानमालेचे नाव	मा. वक्ते	विषय	स्थळ	झालेली दिनांक
१	२	३	४	५	६
१	आदरणीय श्री. पी. डी. पाटील	डॉ. अशोक चौसाळकर कोल्हापूर	'स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज, सामुहिक विकास व सहकारी कारखानदारी'	श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर	२६ जुलै २०१८
२	राजर्षी शाहू छत्रपती (फंडातील)	डॉ. टी. एस. पाटील	'राजर्षी शाहू महाराज यांचे जीवन, तत्वज्ञान व कार्य'	बाबासाहेब चितळे महाविद्यालय भिलवडी. ता.पलुस, जि.सांगली	०५ ऑगस्ट २०१८
३	प्राध्यापक. डॉ. एम. एस. प्रसाद गौरव स्मृती	प्रा. डॉ.एच. व्ही. कुंभोजकर	'Contribution of Turing Awardee And His Work'	संगणकशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१४ ऑगस्ट २०१८
४	कै. क्रांतिसिंह नाना पाटील	प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार	'साताराच्या प्रतिसरकारच्या चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान'	राजारामबापू सेमिनार हॉल, एस.डी.पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, वाळवा तालुका शिक्षण संस्था	१६ ऑगस्ट २०१८
५	कै. भाऊसाहेब खांडेकर (फंडातील)	प्रा.डॉ.रणधीर शिंदे मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	'वि. स. खांडेकर : चरित्र व साहित्य'	यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी	०३ सप्टेंबर २०१८
६	श्री. दत्ताबाळ स्मृती	डॉ. सुभाष के. देसाई को- ऑर्डिनेटर	'दत्ताबाळांचे जीवन व कार्ये'	अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	०३ सप्टेंबर २०१८
७	कर्मवीर भाऊराव पाटील (फंडातील)	प्रा.डॉ.संजय थोरात	'कर्मवीर भाऊराव पाटील - जीवन व कार्य'	म.ह.शिंदे महाविद्यालय, तिसंगी,ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर	२२ सप्टेंबर २०१८
८	सत्यशोधक कृष्णाजी रामजी पाटील	श्री. किशोर बेडकिहाळ	राष्ट्रवाद : संकल्पना व स्वरुप	नाइट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर	२६ सप्टेंबर २०१८
९	भद्रकाली ताराराणी (फंडातील)	डॉ. भारती पाटील	'भारतीय स्त्रियांचे इतिहासातील योगदान'	मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव	२६ सप्टेंबर २०१८
१०	डॉ. अंजली पाटील स्मृती	प्रा.डॉ. श्रीकांत परांजपे	'दहशतवादाचे बदलते स्वरुप'	राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	०५ ऑक्टोबर २०१८
११	कै.प्रभाकरपंत कोरगांवकर	श्री. किशोर बेडकिहाळ	आधुनिक महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण	सामाजिक वंचितता व सर्वसमावेशक धोरण, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	०१ ऑक्टोबर २०१८

१	२	३	४	५	६
१२	कै.कासुबाई यलबाजी ममता तुकाराम-मंगल स्मृती	प्रा.डॉ.अशोक चौसाळकर	सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता	राजर्षी शाहू कॉलेज, कोल्हापूर	२९ नोव्हेंबर २०१८
१३	डॉ. बाबासाहेब आंबेडकर (फंडातील)	मा.प्रा.डॉ. चंद्रकांत कुरणे,	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही	कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज	०६ डिसेंबर २०१८
१४	स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर	प्रा.डॉ. अवनिश पाटील,	भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे काही दुर्लक्षित पैलू	कला व वाणिज्य महाविद्यालय, उंडाळे, ता. कराड, जि. सातारा	०८ डिसेंबर २०१८
१५	क्रांतीअग्रणी डॉ. जी. डी. बापू. लाड	प्रा. डॉ. अशोक चौसाळकर	क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड यांचे स्वातंत्र्य लढ्यतील योगदान	शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	०८ डिसेंबर २०१८
१६	प्रिन्सिपल एस. व्ही. आपटे	श्री. विनायक राजाध्यक्ष	सायबर गुन्हेगारी : धोका आणि निवारण उपाय	वनस्पतीशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	२० डिसेंबर २०१८
१७	ज्ञानविस्तार मानव्य (फंडातील)	डॉ. ए. एम. गुरव,	उच्च शिक्षणातील संधी आणि आव्हाने	शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज	३१ डिसेंबर २०१८
१८	सावित्रीबाई फुले (फंडातील)	डॉ. विद्या बाळ, पुणे,	स्त्री-पुरुष समानता	श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा.	३ जानेवारी २०१९
१९	डॉ. आप्पासाहेब तानसेन वरूटे स्मृती	डॉ. आय. के. पै,	Biodiversity Conservation	प्राणीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	०५ जानेवारी २०१९
२०	कै. पी. बी. साळुंखे	प्राचार्य डॉ.टी.एस.पाटील,	महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आजच्या संदर्भात प्रस्तुतता	आजीवन अध्यायन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१६ जानेवारी २०१९
२१	छत्रपती प्रतापसिंह महाराज (फंडातील)	किशोर बेडकिहाळ, सातारा.	समाजसुधारक व महाराष्ट्रातील समाज परिवर्तन	सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.	१८ जानेवारी २०१९
२२	डॉ. लाभसेटवार प्रतिष्ठान पुरस्कृत वि.स.खांडेकर जयंती	विनय हर्डिकर, पुणे	पुन्हा एकदा खांडेकर	वि.स.खांडेकर भाषाभवन, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२१ जानेवारी २०१९
२३	शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे	प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे,	शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : ज्ञान संस्कृतीचे दूत	विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), कोल्हापूर	२३ जानेवारी २०१९

१	२	३	४	५	६
२४	आचार्यरत्न देशभूषण श्री. - मुनिराज स्मृती	डॉ. अजित पाटील	भगवान महावीर वैचारिक दि स्तंभ	भगवान महावीर, अध्यासन	२१ एप्रिल. २०१९
२५	मराठा इतिहास (फंडातील)	डॉ. अवनिश पाटील	मराठ्यांचा इतिहास	आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे,जि. सातारा.	८ फेब्रुवारी २०१९
२६	छत्रपती शिवाजी महाराज (फंडातील)	डॉ. विजयराव नलावडे	छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र्य	डी. पी. भोसले महाविद्यालय. कोरेगाव जि.सातारा.	१९ फेब्रुवारी २०१९
२७	सहकार महर्षी शंकरराव मोहिते- पाटील	प्रा. डॉ. व्ही. बी जुगळे,	सहकारी चळवळ : दशा, दिशा व आव्हाने	अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	५ मार्च २०१९
२८	कै.कवी कुसुमाग्रज	डॉ. रफिक सुरज मुल्ला.	कुसुमाग्रज आणि समकालीन कविता	यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी	१० मार्च २०१८
२९	उद्योगभूषण कै. श्री.शिवाजीराव देसाई स्मृती	डॉ. श्रीरंग गायकवाड	देणाऱ्याने देत जावे	कायमस्वरुपी के.आय.टी.कॉलेज, गोकूळशिरगाव, जि. कोल्हापूर	१३ मार्च २०१९
३०	प्रा. नरहर विष्णू कारेकर (विज्ञान)	श्री. प्रशांत गायकवाड	पंचगंगा प्रदुषण सद्य:स्थिती	पर्यावरणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१६ मार्च २०१९
३१	संत तुकाराम	प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे	तुका झालासे कळस	संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	२७ मार्च २०१९
३२	महात्मा फुले स्मृती	प्रा. डॉ. सुनीता सूर्यवंशी	महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य	श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, जि. सातारा	११ एप्रिल २०१९
३३	पुढारीकार पद्मश्री कै.डॉ. ग.गो. जाधव	स्मृती मा. एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त)	दहशतवाद आणि भारत	राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर	२० मे २०१९

■■■

८. दीक्षान्त समारंभ व विद्यापीठ वर्धापन दिन

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी दुपारी २.०० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात संपन्न झाला. या समारंभास सन्माननीय प्रमुख पाहुणे माननीय डॉ. भीमराया म्हेत्री, संचालक भारतीय प्रबंध संस्थान तिरुचिरापल्ली हे उपस्थित होते. माननीय श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव, मा. कुलपती तथा राज्यपाल, महाराष्ट्र राज्य हे समारंभाचे अध्यक्षस्थानी होते.

■■■

५६ वा वर्धापन दिन - १८ नोव्हेंबर २०१८

प्रमुख पाहुणे वर्धापन दिन

मा. प्रा. (डॉ.) पी. पी. पाटील, कुलगुरु,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

.....✻ **गुणवंत यादी** ✻.....

१. **डॉ. आर. के. कामत,** - विद्यापीठातील गुणवंत शिक्षक,
प्राध्यापक, अधिविभाग प्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग

२. **डॉ. श्रीमती भारती पाटील,** - विद्यापीठातील गुणवंत शिक्षक
प्राध्यापक, अधिविभाग प्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग

३. **श्रीमती टी. एस. भूतकर,** - विद्यापीठातील गुणवंत सेवक
सहायक कुलसचिव,

४. **श्री. नामदेव नानासो चरापले,** - विद्यापीठातील गुणवंत सेवक
सिनियर टेक्निकल असिस्टंट

५. **श्री. भास्कर राजाराम सांगावकर,** - विद्यापीठातील गुणवंत सेवक
वरिष्ठ लघुलेखक

६. **श्री. सदानंद श्रीधर माने** - विद्यापीठातील गुणवंत सेवक
वरिष्ठ लघुलेखक

७. **श्री. मारूती नारायण मगदूम,** - विद्यापीठातील गुणवंत सेवक
हवालदार

८. **डॉ. अरूणकुमार जयराम सकटे,** - महाविद्यालयीन गुणवंत सेवक
प्रबंधक - शिवाजी कॉलेज, सातारा.

■■■

९. शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती

गुणवत्ता शिष्यवृत्ती ही विद्यापीठाची विशेष शिष्यवृत्ती योजना आहे.
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती तपशील

अ. क्र.	गटाचे नाव	मुले	मुली	एकूण	एकूण रक्कम
१	सर्वसाधारण गट	७९	३१७	३९६	२३,६५,०००/-
२	आर्थिक दुर्बल घटक	१२	२७	३९	४,३५,०००/-
३	निराधार घटक	३	६	९	९०,०००/-
४	अंध, अपंग, मुकबधीर व कर्णबधीर गट	४	४	८	८५,०००/-
५	गुणवंत खेळाडू गट	६	७	१३	१,०५,०००/-
	एकूण	**१०१**	**३६१**	**४६५**	**३०,८०,०००/-**

सर्वसाधारण गटातील गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या विद्यार्थी विद्यार्थीनीच्या शाखानिहाय पुर्ण देय रक्कमेचा तक्ता

अ. क्र.	विद्याशाखा	मुले	मुली	एकूण	एकूण रक्कम
१	पदवीपूर्व कला व सामाजिकशास्त्रे	१३	७४	८७	४,३५,०००
२	पदव्युत्तर कला व सामाजिकशास्त्रे	४	१९	२३	२,३०,०००
३	पदवीपूर्व वाणिज्य	८	६६	७४	३,७०,०००
४	पदव्युत्तर वाणिज्य	..	४	४	४०,०००
५	पदवीपूर्व विज्ञान	२२	५७	७९	३,९५,०००
६	पदव्युत्तर विज्ञान	५	३२	३७	३,६५,०००
७	अभियांत्रीकी	२६	३८	६४	३,२०,०००
८	एमसीए वाणिज्य	..	..	..	..
९	एमसीए विज्ञान	..	..	..	..
१०	शिक्षणशास्त्र	..	..	..	..
११	विधी	..	३	३	२०,०००
१२	बीबीए	..	६	६	६०,०००
१३	बीसीए	..	९	९	४५,०००
१४	बीसीएस	..	..	..	..
१५	एमबीए	..	६	६	६०,०००
१६	ग्रंथालय व माहितीशास्त्र	..	..	..	..
१७	बीएसडब्लू एमएसडब्लू	१	३	४	२५,०००
	एकूण	**७९**	**३१७**	**३९६**	**२३,६५,०००**

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील गुणवंत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी–विद्यार्थिनींचा तक्ता

अ. क्र.	विद्याशाखा	मुले	मुली	एकूण	एकूण रक्कम
१	कला व सामाजिकशास्त्रे	१	७	८	८५,०००
२	वाणिज्य	१	७	८	८०,०००
३	विज्ञान	४	४	८	९५,०००
४	अभियांत्रीकी	३	५	८	८०,०००
५	शिक्षणशास्त्र	०	१	१	१०,०००
६	विधी	..	१	१	१०,०००
७	सामाजिकशास्त्र	३	२	५	७५,०००
	एकूण	**१२**	**२७**	**३९**	**४,३५,०००**

गुणवत्ता व कौटुंबिक परिस्थितीच्या आधारे दिलेल्या निराधार शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी–विद्यार्थिनींचा तक्ता

अ. क्र.	विद्याशाखा	मुले	मुली	एकूण शिष्यवृत्ती संख्या	एकूण रक्कम
१	कला व सामाजिकशास्त्रे	..	१	१	१०,०००
२	वाणिज्य	..	४	४	४०,०००
३	विज्ञान	३	१	४	४०,०००
४	अभियांत्रीकी	..	..	..	..
५	शिक्षणशास्त्र	..	..	..	..
	एकूण	**३**	**६**	**९**	**९०,०००**

अंध, अपंग, कर्णबधीर व मुकबधीर गटातील गुणवत्ता व शारीरिक अपंगत्व यांच्या आधारे दिलेली शिष्यवृत्ती

अ. क्र.	विद्याशाखा	मुले	मुली	एकूण शिष्यवृत्ती संख्या	एकूण रक्कम
१	कला व सामाजिकशास्त्रे	१	२	३	३०,०००
२	वाणिज्य	२	१	३	३०,०००
३	विज्ञान	..	..	..	..
४	अभियांत्रीकी	..	१	१	१०,०००
५	शिक्षणशास्त्र	..	..	..	..
६	सामाजिकशास्त्र	१	..	१	१५,०००
	एकूण	**४**	**४**	**८**	**८५,०००**

गुणवंत खेळाडू शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी–विद्यार्थिनींचा शाखानिहाय माहितीचा तक्ता

अ. क्र.	विद्याशाखा	मुले	मुली	एकूण शिष्यवृत्ती संख्या	एकूण रक्कम
१	कला व सामाजिकशास्त्रे	३	४	७	७०,०००
२	वाणिज्य	..	२	२	२५,०००
३	विज्ञान	३	१	४	४०,०००
४	अभियांत्रीकी	..	..	..	..
५	शिक्षणशास्त्र	..	..	..	..
	एकूण	**६**	**७**	**१३**	**१,०५,०००**

■■■

१०. शिष्यवृत्ती अनुदान

जमा अनुदाने : शिष्यवृत्ती/छात्रवृत्ती/प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना शुल्क सवलती इत्यादी.

अ.क्र.	तपशिल	मंजूर विद्यार्थी संख्या	मंजूर रक्कम (रु.)
१. मागासवर्गीय शिष्यवृत्ती			
१.	एस.सी. शिष्यवृत्ती	३९०	२२७७४४७
२.	ओ.बी.सी. शिष्यवृत्ती	२९४	१५५७०५९
३.	व्हिजेएनटी शिष्यवृत्ती	२१०	७३९६९८
४.	एस.बी.सी. शिष्यवृत्ती	३५	२४२१४२
५	एस.टी. शिष्यवृत्ती	२२	७२५५६
शुल्क सवलत			
६.	एस.सी. फ्रिशिप	५४	७६४०५७
७.	ओ.बी.सी. फ्रिशिप	९५	४४३८०८
८	व्हिजेएनटी फ्रिशिप	४८	२०८३२८
९.	एस.बी.सी. फ्रिशिप	१२	६१७१६
१०.	एस.टी. फ्रिशिप	५	३१५२०
११.	दक्षिणा अधिछात्रवृत्ती	--	--
१२.	विडी कामगार	--	--

सन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षापासून भारत सरकार मागासवर्गीय शिष्यवृत्ती/फ्रिशिप चे अर्ज हे शासनाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे भरण्यात येत आहेत. शासनाकडून जसे अनुदान मंजुर होईल तसे संबंधित विद्यार्थ्यांच्या नावे शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून विद्यापीठाने शिष्यवृत्तीसाठी उघडलेल्या बँक खात्यावर जमा करण्यात येते.

पी.जी. प्रवेश विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून विद्यापीठाने पदवी स्तरावर अंतिम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढीस चालना मिळण्याच्या दृष्टिकोनातून ही योजना विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालयाअंतर्गत राबविण्यात येत आहे.

अ. क्र.	**अग्रणी महाविद्यालय / परिक्षेत्रातील महाविद्यालयाचे नांव**	Research Grant Per College	Overhead Charges	Amount
१.				
१.	विलिंग्डन कॉलेज, सांगली	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**३०,०००/-**
२.				
१.	सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड कराड, जि. सातारा.	१०,०००/-		१०,०००/-

अ. क्र.	अग्रणी महाविद्यालय / परिक्षेत्रातील महाविद्यालयाचे नाव	Research Grant Per College	Overhead Charges	Amount
३.	बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण	१०,०००/-		१०,०००/-
४.	महिला महाविद्यालय (आर्टस् ॲण्ड कॉमर्स) कराड	१०,०००/-		१०,०००/-
५.	कृष्णा महाविद्यालय, रेठरे (बुद्रुक), ता. कराड. जि. सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
६.	आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कोयनानगर, ता. पाटण, जि. सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**७०,०००/-**
३.				
१.	के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग कोल्हापूर	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	दत्ताजीराव कदम टेक्सटाईल ॲन्ड इंजिनिअरींग इन्स्टिटयुट, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
३.	भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मोरेवाडी, कोल्हापूर .	१०,०००/-		१०,०००/-
४.	डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
५.	डॉ.डी.वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरींग साळोखेनगर, कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
६.	धनंजय महाडिक ग्रुप ऑफ इन्स्टि. गट क्र.२०९ ए.एन.एच. ४ विकासवाडी, कागल, जि. कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
७.	तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
८.	संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग चिंचेवाडी, महागांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
९.	डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, भडगांव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**१,००,०००/-**
४.				
१.	श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
३.	राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
४.	विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
५.	दि न्यू कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
६.	राजाराम कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
७.	यशवंतराव चव्हाण कॉलेज, (के.एम.सी.) गंगावेश, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
८.	कमला कॉलेज, कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
९.	गोपाळकृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-

अ. क्र.	अग्रणी महाविद्यालय / परिक्षेत्रातील महाविद्यालयाचे नाव	Research Grant Per College	Overhead Charges	Amount
१०.	कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेंशन कोर्सेस फॉर वुमन द्वारा सायबर, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
११.	शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
१२.	भारती विद्यापीठ, न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर	१०,०००/-		१०,०००/-
१३.	डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
१४.	महावीर कॉलेज, कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**१,५०,०००/-**
५.				
१.	भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी मोरेवाडी, कोल्हापूर	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी, कासेगांव, जि. सांगली	१०,०००/-		१०,०००/-
३.	अरविंद गवळी कॉलेज फार्मसी, जैतापूर, सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
४.	सातारा कॉलेज ऑफ फार्मसी, देगांव, जि, सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
५.	गव्हर्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कराड जि.सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
६.	संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचेवाडी, महागांव, ता. जावळी, जि.सातारा.	१०,०००/-		१०,०००/-
७.	तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**८०,०००/-**
६.				
१.	डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, सांगली.	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
			एकूण	**२०,०००/-**
७.				
१.	श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स् कॉलेज हातकणंगले, जि. कोल्हापूर.	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	श्री. व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
३.	राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रूकडी, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
४.	दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
५.	श्रीमती. आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
६.	विजयसिंह यादव आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, पेठवडगांव, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**७०,०००/-**

अ. क्र.	अग्रणी महाविद्यालय / परिक्षेत्रातील महाविद्यालयाचे नाव	Research Grant Per College	Overhead Charges	Amount
८.				
१.	आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पलूस	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, रामारंदनगर.	१०,०००/-		१०,०००/-
३.	मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव.	१०,०००/-		१०,०००/-
४.	क्रांतीसिंह नाना पाटील आर्टस ॲण्ड सायन्स महाविद्यालय वाळवे, जि. सांगली.	१०,०००/-		१०,०००/-
५.	मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव, ता. वाळवा, जि. सांगली.	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**६०,०००/-**
९.				
१.	अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स फॅकल्टी ऑफ इंजि., वाठार तर्फ वडगांव जि. कोल्हापूर.	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
२.	डॉ.जे.जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजि., जयसिंगपूर जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
३.	डी.वाय.पाटील एज्युकेशन सोसायटी चे डी.वाय.पाटील टेक्नीकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजि., तळसंदे ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
४.	संजीवनी इंजि.आणि टेक्नोलॉजी, सोमवार पेठ ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
५.	नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजि.पेठ ता. वाळवा, जि. सांगली.	१०,०००/-		१०,०००/-
६.	तात्यासाहेब कोरे इन्स्टि.ऑफ इंजि.ॲन्ड टेक्नोलॉजी वारणानगर, जि. कोल्हापूर.	१०,०००/-		१०,०००/-
७.	संचालक सौ. सुशिला डी. घोडावत चॅरिटेबल ट्रस्टचे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन, अतिग्रे, ता. हातकणगले (इंजिनिअरीग फॅकल्टी) संचालक सौ. सुशीला डी. घोडावत चॅरिटेबल ट्रस्टचे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन, अतिग्रे ता हातकणगंले (एमबीए फॅकल्टी); (Director, Sanjay Ghodawat Group of Institue Atigre)	१०,०००/-		१०,०००/-
			एकूण	**८०,०००/-**
१०.	डॉ. घाळी, कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर (अग्रणी महाविद्यालय)	१०,०००/-	१०,०००/-	२०,०००/-
			एकूण	**२०,०००/-**
		एकूण रक्कम		**६,८०,०००/-**

अ. क्र.	अग्रणी महाविद्यालयाचे नाव	रक्कम
१	विलिंग्डन कॉलेज, सांगली	३०,०००/-
२	सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड	७०,०००/-
३	के.आय.टी.ज. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग कोल्हापूर	१,००,०००/-
४	श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	१,५०,०००/-
५	भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फार्मसी मोरेवाडी, कोल्हापूर.	८०,०००/-
६	डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, सांगली.	२०,०००/-
७	श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स् कॉलेज हातकणंगले, जि. कोल्हापूर.	७०,०००/-
८	आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पलूस	६०,०००/-
९	अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स फॅकल्टी ऑफ इंजि. वाठार तर्फ वडगांव, जि. कोल्हापूर.	८०,०००/-
१०	डॉ. घाळी, कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर	२०,०००/-
	एकूण रक्कम	**६,८०,०००/-**

■■■

११. प्रशासकीय विभागांचा अहवाल

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अग्रणी महाविद्यालय योजनेची माहिती

प्रस्तावना

उच्च शिक्षण पध्दतीत शैक्षणिक विकासासंबधी तसेच विकसनशील देशात असलेल्या काही समान बाबी विचारात घेता उच्च शिक्षणामध्ये गुणवत्ता निश्चितीकरण ही बाब अतिशय महत्त्वाची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मधील शिफारशींनुसार व विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ कलम १२ (CCC) अन्वये विश्वविद्यालय अनुदान आयोगाने 'राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणिकरण परिषद (नॅक)' या संस्थेची स्थापना १९९४ बेंगलोर येथे करण्यात आली.

उच्चशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी व जागतिकीकरणातील ध्येय धोरणांन्वये येऊ घातलेल्या परदेशी विद्यापीठांच्या स्पर्धेचे आवाहन स्वीकारण्याच्या दृष्टीने व विद्यार्थी केंद्रबिंदू मानून समाजाभिमुख शिक्षण व संशोधनातील गुणवत्ता उंचावण्यासाठी विद्यापीठामध्ये नोंव्हेबर, २००२ मध्ये नॅक या विभागाची स्थापना करण्यात आली.

उच्च शिक्षणातील शैक्षणिक विकास धोरणान्वये उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेत सातत्य राखण्याच्या दृष्टीने नॅक, बेंगलोर या संस्थेने प्रमाणिकरण झालेल्या विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांनी देखील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) स्थापन करावे असे मार्गदर्शक तत्त्वात सांगितले आहे. यास अनुसरून विद्यापीठात IQAC अंतर्गत Quality Advisory Council (QAC) समीतीचे गठन करणेत आले होते तथापि आय.क्यु.ए.सी. च्या बदलत्या मार्गदर्शक तत्वानुसार आय.क्यु.ए.सी. समितीचे गठन करण्यात आले आहे. त्यानुसार सदर समिती सदस्यांच्या बैठका नियमित आयोजित केल्या जातात.

सन २००४ साली विद्यापीठाचे पहिले नॅकचे मूल्यांकन करण्यात आले होते व सन २००९ मध्ये विद्यापीठाने नॅकचे दूसरे पुर्नमूल्यांकन व सन २०१४ मध्ये तिसरे पुर्नमूल्यांकन करून घेतले होते. सदर मूल्यांकनामध्ये विद्यापीठास अनुक्रमे 'B+', 'B' व 'A' हे मानांकन प्राप्त झालेले आहेत.

संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थेपैकी किती महाविद्यालयांनी नॅकचे मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन करून घेतले व त्यामध्ये महाविद्यालयांना प्राप्त झालेल्या श्रेणीचा अहवाल खालीलप्रमाणे,

नॅक मूल्यांकन झालेली महाविद्यालये									
	A++	A+	A	B++	B+	B	C++	C+	C
I st Cycle	---	1	20	17	27	50	33	12	15
II nd Cycle	---	---	20	1	5	90	---	---	04
III rd Cycle	---	05	14	06	12	05	---	---	01

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष; *(Internal Quality Assurance Cell) (IQAC)*

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाद्वारे विद्यापीठाचा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल *(Annual Quality Assurance Report (AQAR)* तयार करणेचे काम केले जात असून सदरचा अहवाल नॅक, बेंगलोर यांना प्रतिवर्षी सादर करणेत येतो. आय.क्यु.ए.सी. च्या मार्गदर्शक तत्वानुसार आय.क्यु.ए.सी. समितीची बैठक आयोजित करण्यात येते. सदर बैठकीमध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता वाढीबाबत जे निर्णय होतात त्यानुसार कामकाज केले जाते. तसेच नॅक सहयोगी समितीने विद्यापीठामधील ज्या उणिवा दर्शविलेल्या आहेत त्या दूर करणेच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातात तसेच पुढील नॅकला सामोरे जाण्याच्या दृष्टीकोनातून योग्य त्या सोयीसुविधा व बदल करणेबाबत प्रशासनास अथवा संबंधितांना सूचित करण्यात येते.

विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी नॅकचे मूल्यांकन अथवा पुर्नमूल्यांकन करण्याबाबत महाविद्यालयांना वारंवार कळविले जाते. तसेच विद्यापीठातील विविध विभागांतर्गत प्राचार्य/संस्थाचालक यांचेसाठी घेतल्या जाणाऱ्या कार्यशाळेमध्ये नॅक करून घेणेबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच शासनाकडून महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन करून घेण्याबाबतचे सर्व आदेश सर्व महाविद्यालयांना कळविले जातात.

विद्यापीठातील आय.क्यु.ए.सी. डॉक्युमेंटेशन सेंटरला महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था येथील प्राचार्य, शिक्षक अथवा सदर महाविद्यालयातील नॅकचे कामकाज करण्यासाठी नियुक्त केलेली महाविद्यालय स्तरावरील समिती भेट देत असते. सदर भेटीदरम्यान उपस्थितांना नॅकला सामोरे जाताना महाविद्यालयातील महत्त्वाचे डॉक्युमेंटेशन नॅक सहयोगी समितीस कशा प्रकारे सादर करावेत अथवा याबाबत कोणकोणती तयारी केली पाहिजे याबाबतचे मार्गदर्शन केले जाते. सदर डॉक्युमेंटेशन पाहणेकरीता अन्य विद्यापीठे ही भेट देतात.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा मार्फत राबविण्यात आलेले महत्त्वपूर्ण उपक्रम

१. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य/आय.क्यु.ए.सी. समन्वयक यांच्याकरीता नॅक, बेंगलोर पुरस्कृत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा मार्फत 'Revised Accreditation Framework of NAAC' या विषयावर दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ रोजी एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

२. ज्या महाविद्यालयांचे नॅककडून अद्याप मूल्यांकन झालेले नाही तसेच ज्या महाविद्यालयांनी फक्त First Cycle पूर्ण केली आहे. अशा महाविद्यालयांकरीता रूसा पुरस्कृत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा मार्फत 'NAAC : Revised Accreditation Framework (RAF)' या विषयावर दि. ०८, ०९ व १० मे, २०१९ रोजी Faculty Development Program (FDP) आयोजित करण्यात आला होता.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा व्यतिरिक्त या विभागामधील कामकाजाची माहिती.

अग्रणी महाविद्यालय योजना (Lead College Scheme)

विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांपैकी बहुतांशी महाविद्यालये ही ग्रामीण भागात आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील महाविद्यालयांची माहिती तसेच तेथे असणारे नवनवीन तंत्रज्ञान याची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळावी व शहरी भागातील विद्यार्थी ग्रामीण भागामध्ये जावून तेथील माहिती घ्यावी या उद्देशाने सन २००५ मध्ये अग्रणी महाविद्यालय योजना सुरू करण्यात आली. सदर योजनेबाबतची मार्गदर्शक तत्त्वे तयार केलेली असून त्यानूसार कामकाज केले जाते.

या योजनेतंर्गत अग्रणी महाविद्यालय शिखर समिती अस्तित्वात असून सदर समितीच्या बैठका आयोजित केल्या जातात. तसेच सदर योजनेद्वारे महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व समाजातील इतर घटक यांच्या हिताचे अनेक उपक्रम राबविले जातात.

अग्रणी महाविद्यालयांची दर तीन वर्षांनी नव्याने नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार सन २०१९-२० ते सन २०२१-२२ या तीन वर्षासाठी नव्याने अग्रणी महाविद्यालयांची नियुक्ती करण्यात आली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अग्रणी महाविद्यालयांना अग्रणी महाविद्यालय योजनेचे विविध उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये जमा केलेल्या अग्रणी महाविद्यालय शुल्कापैकी ९० टक्के रक्कम खालील प्रमुख अग्रणी महाविद्यालयांना आदा करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	प्रमुख अग्रणी महाविद्यालयाचे नाव	आदा केलेली ९०: रक्कम
१	श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	६२३२९५
२	मा. श्री. आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर	२६६७८२
३	डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर	३०४८५२
४	म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, जि. कोल्हापूर	२०९७९०
५	डि. आर. माने कॉलेज कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कागल, जि. कोल्हापूर	२७७८५२
६	विलिंग्डन कॉलेज, सांगली	१८७३७९
७	डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलीवाडी, सांगली.	३२३५९५
८	यशवंतराव चव्हाण आटर्स, कॉमर्स कॉलेज, उरूण इस्लामपूर, जि. सांगली	२६६७७७
९	पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ,जि. सांगली	१७९९७७
१०	पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव, जि. सांगली	२०८४४०
११	कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस, जि. सांगली	१५३९२२
१२	छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा	४२७३८८
१३	सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा	४०५६०७

अ.क्र.	प्रमुख अग्रणी महाविद्यालयाचे नाव	आदा केलेली ९०: रक्कम
१४	दहिवडी कॉलेज, दहिवडी, जि. सातारा.	२७१७७८
१५	किसनवीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा.	१९७७७४
१६	महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर.	४१३५५
१७	जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.	८६८५
१८	महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगांव, जि. सांगली.	३४२००
१९	कॉलेज ऑफ एज्युकेशन, कराड, जि. सातारा.	१४९८५
२०	भारती विद्यापीठाचे, कॉलेज ऑफ फार्मसी, मोरेवाडी, जि. कोल्हापूर.	४७५८३०
२१	के.आय.टि.ज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोल्हापूर.	१२३५१३७
२२	अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन वाठार तर्फे वडगांव, जि. कोल्हापूर	७२६६६०
२३	आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि. सांगली.	१०७६६९२
२४	कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इजिनिअरींग अँड पॉलीटेक्निक, सातारा.	४३६८१५

उपरोक्तप्रमाणे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेवर विद्यापीठामध्ये एकुण ९२,३९,५२५/- (अक्षरी ब्यान्नव लाख एकोणचाळीस हजार पाचशे पंचवीस फक्त) इतके शुल्क कार्यालयाकडे जमा झाले असून त्यापैकी ९०: रक्कम अग्रणी योजनेद्वारे खर्च करण्यासाठी उपरोक्त प्रमुख अग्रणी महाविद्यालयांना एकूण रक्कम ८३,१५,५६७/- (अक्षरी ष्याऐंशी लाख पंधरा हजार पाचशे सदुसष्ठ फक्त) इतके आदा केलेले आहेत व उर्वरित १०% रक्कम ९,२३,९५९/- (अक्षरी नऊ लाख तेवीस हजार नऊशे एकोणसाठ फक्त) विद्यापीठ कार्यालयाकडे जमा केलेली आहे.

विशेष कक्ष विभाग

खालील समितीने मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासनाच्या योजना, प्रवेश प्रक्रिया, पदोन्नत्या आणि इत्यादी पुरक बाबींची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी विशेष कक्षाच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करावयाचे आहे. दंडक १५८ (२.१) नुसार विशेष कक्ष स्थायी समितीची स्थापना करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

अ) विशेष कक्ष स्थायी समिती

१.	प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे, मा.कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	अध्यक्ष
२.	डॉ. डी. टी. शिर्के, मा. प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर	सदस्य
३.	श्रीमती डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	सदस्य
४.	डॉ. आर.जी. सोनकवडे, पदार्थ विज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	सदस्य
५.	प्रा. एस.एस.चव्हाण, रसायनशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.	सदस्य
६.	प्राचार्य बी.व्ही.ताम्हणकर, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.	सदस्य
७.	प्राचार्य डॉ. एस.टी. वाघमोडे, आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा.	सदस्य
८.	प्राचार्य पी.आर. शेवाळे, डी.डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर	सदस्य
९.	डॉ. अरूण बी. पाटील, आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा.	सदस्य
१०.	डॉ. एस. एस. पन्हाळकर, भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
११.	श्री. श्रीपाल गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
१२.	डॉ. एन. बी. मासाळ, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज	सदस्य
१३.	श्रीमती सुलक्षणा कुलकर्णी, बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव	सदस्य
१४.	प्राचार्य आर. बी. बनसोडे, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड.	सदस्य
१५.	श्रीमती सुरेखा टी. आडके, वरिष्ठ सहायक, आस्थापना विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्या
१६.	श्रीमती प्रतिभा श्रीनिवास दीक्षित, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर.	सदस्या

१७. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. निमंत्रित

१८. श्री. ए. एस. नलवडे, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. सदस्य-सचिव
(दि. ०१.०७.२०१८ ते दि. ३०.११.२०१८)

१९. डॉ. पी. एस. पांडव, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. सदस्य-सचिव
(दि. ०६.१२.२०१८ पासून आज अखेर)

ब) विद्यापीठ विशेष कक्ष स्थायी समिती

खालील समितीने मागासवर्गीयांसाठी असलेल्या विद्यापीठामध्ये परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी विशेष कक्षाच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करावयाचे आहे. दंडक १५८ (२.२) नुसार विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर विभाग यांच्यासाठी स्थायी समितीची स्थापना करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

१) प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे, मा. कुलगुरू. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अध्यक्ष

२) प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, मा. प्र-कुलगुरू. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

३) डॉ. एस. डी. शिंदे, भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

४) डॉ. ए. एम. सरवदे, इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

५) श्री. एम. पी. कदम, उपकुलसचिव, संलग्नता टी.१ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

६) श्रीमती एस. ए. यादव, अधीक्षक, म.व. वि.मं. विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

७) श्रीमती जी. एस. पाटील, शिक्षक प्रतिनिधी, शिक्षणशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

८) श्रीमती एन. डी. पाटील, शिक्षकेत्तर प्रतिनिधी, संलग्नता टी. २ विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य

९) डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर निमंत्रित

१०) श्री. ए. एस. नलवडे, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. सदस्य-सचिव
(दि. ०१.०७.२०१८ ते दि. ३०.११.२०१८)

११) डॉ. पी. एस. पांडव, उपकुलसचिव, विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य-सचिव
(दि. ०६.१२.२०१८ पासून आज अखेर)

१) मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी योजना

सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्थांमध्ये मागासवर्गीय शिक्षक पदे भरणे सोयीचे व्हावे म्हणून अर्हता प्राप्त मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी करुन रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याची योजना सुरू आहे. या नाव नोंदणीस उत्तम प्रतिसाद मिळत असून सन २०१८-२०१९ वर्षात एकूण ४८ मागासवर्गीय उमेदवारांची विविध विषयांसाठी नाव नोंदणी केलेली आहे.

२) जाहिरात मान्यता

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील दि. ८/१२/१९९७ व दि-२४/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्धारित टक्केवारीप्रमाणे पदे आरक्षित ठेवून जाहिराती मंजूर करून दिल्या जातात. सन २०१८-२०१९ वर्षात विविध महाविद्यालयांकडून आलेले ७४ जाहिरातीचे मसुदे मंजूर करण्यात आले.

३) मागासवर्गीय कर्मचारी तक्रार निवारण

मागासवर्गीय शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी विशेष कक्ष विभागास प्राप्त झाल्यानंतर या तक्रारीचे निराकरण केले जाते.

४) अनु. जाती/अनु.जमाती विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग

विद्यार्थ्यांसाठी यु.जी.सी. कडून मान्यता प्राप्त पुढील योजना १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विशेष कक्ष विभागामार्फत राबविण्यात येतात.

अ) नेट परीक्षा मार्गदर्शन

सन २०१८-२०१९ मध्ये या योजनेकरिता समन्वयक म्हणून डॉ. के. डी. सोनवणे, मायक्रोबायालॉजी अधिविभाग हे काम पाहत आहे.

ब) रेमिडियल कोचिंग स्कीम

मागासवर्गीयांसाठी रेमिडियल कोचिंग स्कीम ही योजना यु.जी.सी. कडून मंजूर झालेली आहे. सन २०१८-२०१९ मध्ये विद्यापीठातील सर्व अधिविभागातील विद्यार्थ्यांना "Swot Analysis for Self and Career Development विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यानाचा एकूण ३३ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. अनेक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना या योजनेचा चांगला फायदा होत आहे. या योजनेचे समन्वयक म्हणून डॉ. पी. एन. वासंबेकर, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग हे काम पाहत आहेत.

क) समान संधी कक्ष

शिवाजी विद्यापीठाच्या समान संधी कक्ष या योजनेचे समन्वयक म्हणून डॉ. श्रीमती पी. एस. पाटणकर, शिक्षणशास्त्र अधिविभाग या काम पाहत आहेत.

ड) स्किम फॉर पर्सन वुईथ डिसएबिलीटी

शिवाजी विद्यापीठाच्या स्किम फॉर पर्सन वुईथ डिसएबिलीटी या योजनेचे समन्वयक म्हणून डॉ. श्रीमती प्रतिभा देसाई, समाजशास्त्र अधिविभाग या काम पाहत आहेत.

इ) सेवापूर्व भरती स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

मागासवर्गीय उमेदवारांसाठी सेवापूर्व मार्गदर्शन परीक्षा योजना ही यु.जी.सी. कडून मंजूर झालेली आहे. या योजनेतून अनेक मागासवर्गीय विद्यार्थी एम. पी. एस. सी. / यु. पी. एस. पी. परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. या योजनेमध्ये सन २०१७-२०१८ मध्ये एकूण विविध अधिविभागातील १०० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. तसेच, केंद्रातील ०८ विद्यार्थ्यांची वेगवेगळया पदांसाठी नियुक्ती झाली आहे. या योजनेकरीता समन्वयक म्हणून डॉ. जगन कराडे, समाजशास्त्र अधिविभाग हे काम पाहत आहेत.

५) शिवाजी विद्यापीठाच्या स्वनिधीतून मागावर्गीय विद्यार्थ्यांकरिता मुलाखत तंत्र प्रशिक्षण वर्गाचे खालील महाविद्यालयात आयोजन करण्यात आले. त्याकरिता रू. १,००,०००/- अनुदानास मान्यता मिळून प्रत्येक महाविद्यालयास रू. ११,०००/- अनुदान देण्यात आले.

१. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर
२. शिवराज कॉलेज, गडहिंग्लज
३. कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली
४. शि. म. बापुजी साळुंखे कॉलेज, मिरज
५. यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा
६. एस. जी. एम. कॉलेज, कराड
७. मुधोजी कॉलेज, फलटण
८. किसनवीर महाविद्यालय, वाई

सदर महाविद्यालयांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता मुलाखत तंत्र प्रशिक्षण वर्ग कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित केली. सदर कार्यशाळेचा सरासरी १५० प्रमाणे सुमारे १२०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

*** आरोग्य विभाग**

विद्यापीठ आरोग्य केंद्रांची स्थापना सन १९६८ साली असून प्रामुख्याने त्याचा लाभ पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय सेवक तसेच त्यांचे कुंटुंबीय यांना होतो. कालानुरूप आरोग्यकेंद्र अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज झाले असून शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील नामांकित डॉक्टर्स येथे भेटी देतात.

आरोग्य केंद्रामध्ये पूर्णवेळ काम करणारे कर्मचारी

१. डॉ. तु. खा. पाटील	मानद वैद्यकीय अधिकारी
२. डॉ. श्रीमती वि. अ. रानडे	वैद्यकीय अधिकारी
३. श्रीमती रे. च. घावरे	सार्वजनिक आरोग्य परीचारिका
४. श्रीमती मी. म. कोरगावकर	प्रयोगशाळा तंत्रज्ञ
५. श्री. सं. व. गवळी	वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ
६. श्री. नि. क. पलंगे	मिश्रक
७. श्री. प. ल. कर्जुले	क्ष-किरण तंत्रज्ञ
८. श्री. प्र. ज. टेकाळे	वरिष्ठ सहाय्यक
९. श्री. स. म. पाटील	ड्रेसर
१०. श्री. र. नि. पाटील	नर्सिंग ऑर्डरली
११. श्री. द. बं. नांद्रे	शिपाई

आरोग्य केंद्रास भेट देणारे निरनिराळया क्षेत्रातील नामांकित डॉक्टर्स

१. डॉ. नि. दुं. गुरव	मानद कान नाक घसा तज्ज्ञ
२. डॉ. श्रीमती जो. उ. भद्रे	मानद स्त्रीरोग तज्ज्ञ
३. डॉ. ही. ला. वाघाडीया	मानद अस्थिरोग तज्ज्ञ
४. डॉ. सुकुमार शेंडगे	मानद दंत तज्ज्ञ
५. डॉ. विश्राम मेहता	मानद अल्ट्रासोनोग्राफी तज्ज्ञ
६. डॉ. सुनील कुबेर	मानद अल्ट्रासोनोग्राफी तज्ज्ञ
७. डॉ. नितीन वाधवानी	मानद क्ष-किरण तज्ज्ञ
८. डॉ. श्रीमती छाया पुरोहीत	मानद पौगंडावस्था तज्ज्ञ
९. डॉ. श्रीमती गायत्री होशींग	मानद नेत्ररोग तज्ज्ञ
१०. श्री. अभिजीत मुळीक	ऑडिओलॉजी तंत्रज्ञ

आरोग्यकेंद्रात विभागवार लाभ घेतलेल्या रूग्णांची संख्या

१. दंतचिकित्सा विभाग	३३२
२. अस्थिरोग विभाग	२६६
३. क्ष-किरण विभाग	३१४
४ अल्ट्रासोनोग्राफी विभाग	११०
५. प्रयोगशाळा विभाग	१,४००
६. इंजेक्शन व ड्रेसिंग विभाग	८४२
७ . नेत्रचिकीत्सा विभाग	२७०
८. कान नाक विभाग	२०८
९. स्त्रीरोग विभाग	६८
१०. डिस्पेन्सरी विभाग	१२,०००
११. पौगंडावस्था विभाग	१४०

आरोग्यकेंद्रामध्ये नोंदणी रजिस्टर वर नोंद झालेल्या रूग्णांची संख्या : १५,८०४

विशेष आरोग्य सेवा

१. दरवर्षी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी.

२. दरवर्षी शिक्षक व प्रशासकीय सेवक यांची मोफत आरोग्य तपासणी.

३. रक्तदान शिबीर, तसेच नेत्रदान पंधरवडा ईत्यादी उपक्रम.

४. 'जागतिक एड्स दिवस' व 'जागतीक नवसंजीवनी दिवस' या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन.

५. विद्यार्थिनी वसतीगृहात आरोग्यविषयक व्याख्यानाचे आयोजन.

६. सर्पदंश व त्या संबधीचे उपचार याबाबत प्राणिशास्त्र विभागामध्ये व्याख्यान.
७. दिव्यांग विद्यार्थी व कर्मचारी यांचेसाठी 'योगाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान.
८. नोव्हेंबर २०१८ मध्ये भरवण्यात आलेल्या 'पश्चिम विभागीय कबड्डी' स्पर्धेमध्ये खेळाडूंना पूर्ण वेळ आरोग्य केंद्रामार्फत वैद्यकीय सेवा.

उद्यान विभाग

अहवाल सालात उद्यानातील सर्व कामे, माळी सेवक व 'कमवा आणि शिका' या योजनेतील पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे मदतीने वर्षभर करण्यात आली. या विभागाने सेंट्रल सर्कल, अतिथीगृह परिसर, अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने, ग्रंथालय, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा बगीचा व क्रांतीवन इ. यांची देखभाल करून बागा सुशोभित ठेवल्या. वेळोवेळी विद्यापीठात होणाऱ्या सभा-समारंभाना व अधिविभागातील विविध समारंभाकरिता शोभिवंत फुलझाडांच्या कुंड्या, फुलदानी व गुच्छांचा पुरवठा केला. तसेच या विभागाने गवत व फळ विक्री (चिंच, नारळ इ.) केली.

अहवाल सालात रोपवाटीकेमध्ये क्रोटॉन, ॲकेलिफा, रातराणी, अलामेंडा, मोगरा, जास्वंद, लॅटेना, जांभूळ, चिंच, फणस इ. शोभीवंत रोपे व फळझाडे विद्यापीठ नर्सरी मध्ये तयार करण्यात आली. तयार करणेत आलेली शोभिवंत रोपे कर्मचारी व अधिकारी यांचे निवासस्थानासमोर लावण्यासाठी देण्यात आली. या वर्षात उंबर, चिंच, जाभुंळ व विलायती चिंच इ. जंगली झाडे व फळझाडे अशी एकूण ३०० रोपांची लागवड करण्यात आली. या विभागाने सामाजिक वनीकरण, कोल्हापूर यांच्यासोबत संयुक्त विद्यमानाने परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले.

मुलांचे वसतिगृह

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील मुलांचे वसतिगृहातील १, २ व ३ ची माहिती खालील प्रमाणे.

विद्यापीठ परिसरमध्ये मुलांसाठी तीन वसतिगृहे आहेत. सदर वसतिगृहामध्ये पदव्युत्तर विभागातील एम. ए, एम एस्सी, एम. कॉम, एम. बी. ए, एम टेक, एम फिल, आणि पीएच. डी. इ. अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था केली जाते.

शैक्षणिक वर्ष सन २०१८-२०१९ मध्ये वसतिगृह क्र १, २, ३ मध्ये एकून ६६४ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. त्याचबरोबर अन्य विद्यापीठातून आलेल्या संशोधनार्थ, उजळणी व चर्चासत्रासाठी आलेले प्राध्यापकां शिवाय बहि:स्थ परीक्षा किंवा विद्यापीठाच्या अन्य कामाकरीता आलेल्या काही विद्यार्थ्यांची राहण्याची सोय वसतिगृहामध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार करण्यात आली होती. सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील मुलांच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरीता खालील सोयी सुविधा पुरविल्या गेल्या.

१. विद्यार्थ्यांना मनोरंजानासाठी टी. व्ही. तसेच वाचनासाठी वर्तमानपत्रे सोय केली आहे.
२. जनरेटर, सोलर वॉटर हिटर सिस्टीम, विद्यार्थ्यानां स्वच्छ, जंतु विरहित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी Water Purifier RO बसविला आहे तसेच सर्व खोल्यामध्ये पंखे (फॅन) ट्युबलाईट, मोबाईल चार्जसाठी स्वीच इ. सोयी पुरवल्या जातात.
३. वसतिगृह परिसरामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी सिमेंटची बाके बसविण्यात आली आहेत.
४. मर्क्युरी हॅलोजन लॅप वसतिगृह परिसरात बसविण्यात आले आहेत
५. वसतिगृहाभोवती दगडी कंम्पाउड बांधले आहे.
६. इंटरनेट सुविधा ५ कॉम्प्युटर, २० लॅपटॉप इंटरनेट कनेक्शन, सोबत वसतिगृह परिसर मध्ये मोफत Wi-Fi ची सुविधा पुरविणेंत येते
७. वसतिगृह परिसरामध्ये व्यायामाकरीता सिंगलबार व डबलबार बसविण्यात आले आहेत.
८. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यानासाठी अत्याधुनिक ओपन जिमची सुविधा केली आहे.
९. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिकेट, कॅरम बोर्ड, हॉलीबॉल इ. साहित्य दिले जाते.
१०. वसतिगृह क्र. २ व ३ च्या मेसच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी १३ रूम बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे ५२ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय झाली आहे

११. वसतिगृह क्र. २ व ३ च्या मेसच्या इमारतीवर दुसऱ्या मजल्यावर प्रत्येकी ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची सोय केली आहे.

१२. विद्यार्थी वसतिगृहातील सर्व मेस 'ना नफा ना तोटा' या तत्वावर विद्यार्थी विद्यार्थ्यांच्यासाठी क्लब मेस पद्धतीने चालविल्या जातात.

१३. वसतिगृह क्र. १, २ व ३ कडील मेसचे नुतनीकरण केले आहे.

१४. १२० संशोधक विद्यार्थ्यांना रूसा कार्यक्रमांतर्गत नवीन वसतिगृह बाधंण्यात आले आहे. तसेच त्याच वसतिगृहास नवीन अत्याधुनिक मेस बाधंण्यात आले आहे.

अ.नं.	नाव	पदनाम	अ.नं.	नाव	पदनाम
१.	प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर	चिफ रेक्टर	२.	श्री. जी. जे. साळुंखे	रेक्टर
३.	डॉ. एस. पी. पंचगल्ले	रेक्टर	४.	डॉ. एन. एल. तरवाळ	रेक्टर

वसतिगृहामध्ये विद्यार्थ्याकरिता विविध कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते.

मुलांचे वसतिगृहामध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमांची यांदी सन २०१८–२०१९

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
१	०७/१०/२०१८	यशस्वी करिअर मंत्र मार्गदर्शन व्याख्यान	मार्गदर्शन व प्रशिक्षण संस्था इस्लामपूर जि. सांगली याचे संस्थापक अध्यक्ष श्री. कालिदास पाटील सेंटर फॉर करिअर गाईडन्स आणि सायकॉलाजिकल काउन्सेलिगच्या समन्वयक डॉ. श्रीमती. जी. एस. पाटील यांनी केले. विद्यार्थी वसतिगृहाचे चिफ रेक्टर प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी आभार मानले.
२	१२/१०/२०१८	दिव्यांग सोयी सुविधा मार्गदर्शन व्याख्यान	डॉ. श्रीमती पी. बी. देसाई, डॉ पी डी देशपांडे सर मार्गदर्शन केले, युवराज मितारे यांनी आभार
३	२३/१०/२०१८	श्रमदान	मुलांचे वसतिगृहाचे चिफ रेक्टर प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर, रेक्टर डॉ. एस. पी. पंचगल्ले, डॉ. नंदकुमार मोरे व वसतिगृहाचे कर्मचारी व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.
४	०३/०१/२०१९	सावित्रीबाई फुले जयंती	प्रमुख प्रा. (डॉ.) श्रीमती. भारती पाटील, तसेच रशियन भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे, चिफ रेक्टर व सर्व रेक्टर उपस्थित होते .
५	२९/०१/२०१९	महात्मा गांधी १५० जन्मवर्ष व स्मृतीदिन	उपस्थित प्रमुख पाहुणे मा. शेखर सोनाळकर तसेच रशियन भाषा विभागाच्या डॉ. मेघा पानसरे व वसतिगृहाचे रेक्टर उपस्थित होते रेक्टर श्री. गजानन साळुंखे सर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.
६	१९/०२/२०१९	शिवजयंती	डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'शिवाजी महाराज व त्यांचे कार्य' या विषयावरती व्याख्यान दिले या प्रसंगी रेक्टर व सर्व विद्यार्थी उपस्थित होते
७	०५/०३/२०१९	ॲन्टीरॅगिंग आणि मॉनिटरिंग जागरूकता कार्यक्रम	कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव तसेच मुलांचे वसतिगृहाचे चिफ रेक्टर व सर्व रेक्टर उपस्थित होते
८	२९/०३/२०१९	संत तुकाराम व्याख्यानमाला	प्रमुख वक्ते डॉ. रमेश वरखेडे, (नाशिक) यांचे प्रबोधनात्मक मार्गदर्शन यांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडला. तसेच प्रमुख उपस्थित डॉ. नितीन रिंढे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सुनीलकुमार लवटे वसतिगृहाचे सर्व रेक्टर विद्यार्थी उपस्थित होते.

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
९	१४/०४/२०१९	डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती	मुलांचे वसतिगृहाचे चिफ रेक्टर प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर, रेक्टर डॉ. एस. पी. पंचगल्ले, कर्मचारी कर्मचारी विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

विद्यार्थिनी वसतिगृह

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थिनी वसतिगृहाची वार्षिक माहीती पुढील प्रमाणे

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये विद्यापीठ धोरणानुसार सर्व विद्यापीठ प्रवेशीत विद्यार्थिनींना (इच्छुकांना) प्रवेश देणेत येतो. विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये एकूण तीन वसतिगृहे व तीन मेस उपलब्ध आहेत. दरवर्षी तीन वसतिगृहांमध्ये मिळून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींची संख्या १००० ते ११०० च्या आसपास असते. मात्र सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात १४३६ इतकी आहे. या सर्व विद्यार्थिनींची व्यवस्था विद्यार्थिनी वसतिगृहात करणेत आलेली आहे.

अभ्यासक्रम : M.A, M.COM, M.Sc. MCA Science, MCA Commerce, B.Lib, M.Lib, BJC, MJC, MBA, M.Ed, M.Phil, Ph.D. AGPM, L.L.M., M.S.W., MPSC/UPSC, Mass Communication, ग्रंथालय व माहितीशास्त्र.

वसतिगृहांमध्ये उपलब्ध असणाऱ्या तीन मेस ह्या विद्यार्थिनींमार्फत क्लब सिस्टीम नुसार चालविल्या जातात. अत्यंत वाजवी दरात उत्तम प्रतीचे जेवन दिले जाते. शिवाय पाणी, टिव्ही, डिटीएच, यांच्या २४ तास सुविधांबरोबरच गिझर, सोलर सिस्टीमद्वारे गरम पाणी, व ॲक्वागार्डद्वारे पिण्याचे पाणी, प्रत्येक विंगकरीता स्पिकरची सोय, २४ तास सुरक्षा व्यवस्था, तातडीची वैद्यकीय सेवा, तसेच व्यायामाकरिता जिम, योगा वेंडींग मशीन, Wi-Fi ची सेवा उपलब्ध केल्या आहेत.

विद्यार्थिनी वसतिगृहामध्ये आयोजित केलेले विविध कार्यक्रम

अ क्र.	दिनांक	कार्यक्रमांचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
१	२७/७/२०१८	प्रथम वर्ष विद्यार्थिनींचे स्वागत व मिटींग	प्रथम वर्ष विद्यार्थिनींना वसतिगृह नियम/मेस व रॅगिंग माहिती व शासन. (डॉ. प्रतिमा पवार चिफ रेक्टर, डॉ. ए. एस जाधव रेक्टर, डॉ कविता वडाळे रेक्टर डॉ वाळवेकर रेक्टर)
२	३०/७/२०१८	द्वितीय वर्ष विद्यार्थिनी मिटींग	द्वितीय वर्ष विद्यार्थिनींना १. वसतिगृह नियमावली २. रॅगिंग माहिती व नियम ३. मेस नियम. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए. एस जाधव. रेक्टर, डॉ. कविता वड्राळे रेक्टर, उपस्थित वॉर्डन व शिपाई.
३	६/८/२०१८	एम.फिल. आणि पीएच. डी. विद्यार्थिनी मिटींग	एम.फिल आणि पीएच. डी. विद्यार्थिनी मिटींग व प्रवेशाबाबत सुचना तसेच फेलोशीप असणाऱ्या विद्यार्थिनी प्रवेश फी बाबत चर्चा केली. उपस्थिती डॉ. माधुरी वाळवेकर (रेक्टर)
४	७/८/२०१८	कमवा आणि शिका विद्यार्थिनी मिटींग	प्रथम वर्ष विद्यार्थिनींचे स्वागत, कामाचे नियोजन, मेस संबंधी नियम, रॅगिंग माहिती व शासन याबाबत मार्गदर्शन. डॉ. प्रतिमा पवार चिफ रेक्टर
५	८/८/२०१८	बेसिक हेल्थ प्रोग्राम Health Awareness Programme	निरोगी आरोग्य विषयी मार्गदर्शन रोग व प्रतिबंधात्मक कारवाई. संतुलित आहार या विषयी मार्गदर्शन डॉ. रानडे मॅडम हेल्थ सेंटर SUK, डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए. एस जाधव. रेक्टर, डॉ. कविता वड्राळे रेक्टर, डॉ. वाळवेकर रेक्टर.
६	७/९/२०१८	स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा	वसतिगृहातील विद्यार्थिनींकरीता स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
७	२/१०/२०१८	'स्वच्छता अभियान'	गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान वसतिगृह अंतर्गत सफाई केली गेली. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. ए.एस जाधव रेक्टर, डॉ. कविता वडाळे रेक्टर, डॉ. वाळवेकर रेक्टर. उपस्थित नाईट वॉर्डन व शिपाई.
८	६/१०/२०१८	'स्वाधार योजना'	समाजकल्याण अंतर्गत स्वाधार योजना शिष्यवृत्ती बाबत विद्यार्थिनींना माहीती वा मार्गदर्शन. श्री. योगेश दळवी, श्रीमती प्रतिभा सावंत (समाजकल्याण विभाग, कोल्हापूर) डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर)
९	७/१०/२०१८	कव्वाली स्पर्धा	१०० विद्यार्थिनींचे राहण्याचे निवासी व्यवस्था (विविध राज्यातून आलेल्या) कमवा व शिका वसतिगृह
१०	७/१०/२०१८	करिअर गाईडन्स	वसतिगृहातील विद्यार्थिनींना करिअर बाबत मार्गदर्शन – श्री गुरव व गीतांजली पाटील.
११	११/१०/२०१८	UGC अंतर्गत दिव्यांगाकरीता योजना, माहिती व मार्गदर्शन	वसतिगृहात राहणाऱ्या दिव्यांग विद्यार्थिनींना विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. डॉ प्रतिभा देसाई समन्वयक.
१२	१७/१०/२०१८	'दांडिया'	डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या मनोरंजनासाठी.
१३	२३/१०/२०१८	कोजागिरी पौर्णिमा	वसतिगृहात कोजागिरी पौर्णिमा साजरी करणेत आली. मसाले दुध, फरसाण–चिरमुरे वाटप.
१४	३०/१०/२०१८	महाराष्ट्र महिला आरोग्य हक्क परिषद. दि. १४ ते १७ नोव्हेंबर	(विविध राज्यातून आलेल्या महिलांकरिता) ३०० महिलांची निवास व्यवस्था.
१५	३०/१२/२०१८	राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि. १५ ते २४ नोव्हेंबर	विविध राज्यातून आलेल्या NSS विद्यार्थिनींकरीता राष्ट्रीय एकात्मता शिबीर ३०० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था.
१६	३०/१२/२०१८	डॉ. आप्पासाहेब पवार पुण्यतिथी	शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू तसेच कमवा व शिका योजनेचे शिल्पकार डॉ. आप्पासाहेब पवार पुण्यतिथी प्रतिमा पूजन व त्यांच्या कार्याबाबत माहिती डॉ. आसावरी जाधव रेक्टर
१७	३१/१२/२०१८	नवीन वर्ष स्वागत	२०१८ सरत्या वर्षाला निरोप व नविन वर्षाचे २०१९ चे स्वागत विद्यार्थिनी वसतिगृहात केले.
१८	३/१/२०१९	सावित्रीबाई फुले जयंती	प्रो. डॉ. आर. डी. बोडरे S. G. M. College कराड यांनी विद्यार्थिनींना सावित्रीबाईचे विचार व आचार याबाबत मार्गदर्शन डॉ. व्ही.एस.मन्ने डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. वाळवेकर रेक्टर, नाईट वॉर्डन व शिपाई उपस्थित होते.

अ.क्र.	दिनांक	कार्यक्रमाचे नाव	स्वरूप व प्रमुख उपस्थिती
१९	५/१/२०१९	पर्यावरण जागरूकता अभियान	पंचगंगा प्रदुषणमुक्ती जागर, जन प्रदुषणबाबत माहिती व Documentry फिल्म विद्यार्थिनींना दाखवण्यात आली. श्री. कपिल उल्हास पाटील. डॉ.प्रतिमा पवार (चिफ रेक्टर)
२०	१९/१/२०१९	'अविष्कार योजना'	अविष्कार कार्यशाळेकरीता आलेल्या ५० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था.
२१	२९/१/२०१९	The Art of Living Programme	डॉ. अणिमा दहिभाते– सकारात्मकता ताणतणाव निवारण Medition, Music Therepy याबाबत विद्यार्थिनींनीकरिता कार्यशाळा. डॉ. प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. कविता वड्राळे, रेक्टर
२२	---	---	वर्षभरात येणाऱ्या सर्व NSS विद्यार्थिनींकरिता निवास व्यवस्था वसतिगृहात करण्यात येते.

वसतिगृहामध्ये डॉ. श्रीमती प्रतिमा पवार (चिफ रेक्टर), डॉ. कविता वड्राळे, रेक्टर, डॉ. आसावरी जाधव, रेक्टर, डॉ. वाळवेकर, रेक्टर, तसेच वसतिगृहाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता एक कनिष्ठ सहायक व रोजंदारी लिपिक, १ पेज बेसिस, पाच शिपाई, कायमस्वरूपी व करार पद्धतीवर ३ नाईट वॉर्डन काम करीत आहेत.

हॉस्टेल मधील प्रवेशित मुलींची एकूण संख्या

अ. क्र.	हॉस्टेल क्रमांक	विद्यार्थिनींची संख्या
१	हॉस्टेल क्रमांक – १	३६८
२	हॉस्टेल क्रमांक – २	५६९
३	हॉस्टेल क्रमांक – ३	४९९
	एकूण	**१४३६**

विद्याशाखानिहाय एकूण मुलींची संख्या

अ. क्र.	विद्याशाखानिहाय	विद्यार्थिनींची संख्या
१	विज्ञान	९१६
२	सामाजिक शास्त्रे	४६०
३	भाषा	६०
	एकूण	**१४३६**

आस्थापना/पेन्शन विभाग

विद्यापीठातील दि. १ जुलै, २०१८ ते ३० जून २०१९ अखेर सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक, व मयत सेवकांची माहिती खालीलप्रमाणे.

अ.क्र	नांव	पदनाम	जन्मदिनांक	सेवानिवृत्त दिनांक	शेरा
१	श्री. उदय गणपती करवडे	अधीक्षक	२९.७.१९६०	३१.७.२०१८	
२	श्री. मिलिंद महादेव नेटके	सहायक अक्षीक्षक	१७.९.१९६०	३०.९.२०१८	
३	श्री. सुनील शण्मुख सोळंकी	डाटा एन्ट्री ऑपरेटर	०३.०९.१९६०	३०.०९.२०१८	
४	श्री. अनिल शांताराम नलावडे	उपकुलसचिव	६.११.१९६०	३०.११.२०१८	
५	श्री. सुधाकर गणपतराव भोसले	सहायक अधीक्षक	६.१२.१९६०	३१.१२.२०१८	
६	श्री. उदय तुकाराम पाटोळे	सहायक अधीक्षक	५.४.१९६१	---	३१.१२.२०१८ मयत
७	श्री. संजय बाबुराव बचाटे	सहायक अधीक्षक	८.३.१९६१	३१.३.२०१९	
८	श्रीमती शुभदा सुधीर पालेकर	टेलिफोन ऑपरेटर	१३.३.१९६१	३१.३.२०१९	
९	डॉ. श्रीमती ए. यु. अरविदेंकर	प्राध्यापक	११.०४.१९५९	३०.०४.२०१९	
१०	डॉ. श्रीमती पी. आर. पाटील	प्राध्यापक	०५.०४.१९५९	३०.०४.२०१९	
११	डॉ. श्रीमती जी. एस. पाटील	सहा. प्राध्यापक	३१.०३.१९६३	२२.०४.२०१९	
१२	श्री. आर. जी. गवस	प्राध्यापक	१.६.१९५९	३१.०५.२०१९	
१३	डॉ. श्रीमती एन. एस. चव्हाण	प्राध्यापक	४.५.१९५९	३१.०५.२०१९	
१४	श्री. विष्णू दत्तात्रय खाडे	सहायक अधीक्षक	१.६.१९६१	३१.५.२०१९	
१५	श्री. नामदेव तुकाराम ढवळे	सहायक अधीक्षक	१.६.१९६१	३१.५.२०१९	
१६	श्री. शिवाजी रामचंद्र मोरे	वरिष्ठ सहायक	१९.५.१९६१	३१.५.२०१९	
१७	श्री. बाबासो रंगराव पाटील	ड्रायव्हर	१.६.१९६१	३१.५.२०१९	
१८	श्री. मारुती गणपती पाटील	पहारेकरी	१.६.१९५९	३१.५.२०१९	
१९	श्री. प्रकाश रामचंद्र चौगुले	जमादार	१.६.१९५९	३१.५.२०१९	
२०	श्री. मारुती नारायण मगदूम	हवालदार	१.६.१९५९	३१.५.२०१९	
२१	श्री. शिवाजी हरिबा एकशिंगे	हवालदार	१.६.१९५९	३१.५.२०१९	
२२	श्री. शंकर रामचंद्र खोत	माळी	१.६.१९५९	३१.५.२०१९	
२३	श्री. शंकर बापू कांबळे	प्रयोगशाळा सहायक	१.६.१९५९	३१.५.२०१९	
२४	श्री. केरबा शामराव सिद्धनेर्ली	प्रयोगशाळा सहायक	१३.५.१९५९	३१.५.२०१९	
२५	श्री. श्रीमती विजया रविंद्र पुरी	संशोधन शास्त्रज्ञ	०९.०६.१९५४	३०.०६.२०१९	
२६	श्री. गणगपतराव मारुती साळुंखे	कनिष्ठ सहायक	२.६.१९६१	३०.६.२०१९	

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीभवन

शिवाजी विद्यापीठामध्ये एम.ए/एम.एस्सी./एम.कॉम./टेक्नॉलॉजी/यशवंतराव चव्हाण स्टडी ऑफ रुरल डेव्हलपमेंट कडील अभ्यासक्रम या अभ्यासक्रमाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या 'कमवा आणि शिका' योजने अतर्गत प्रवेश देण्यात येतो. या योजने अंतर्गत विद्यार्थीभवन मध्ये राहून विद्यार्थी हा श्रमदान करुन स्वावलंबन तत्वावर शिक्षण घेतो. विद्यार्थीभवन मध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यासाठी वेळोवेळी अनेक योजना आखण्यात येतात. त्या सर्व योजनामध्ये प्रत्यक्ष सहभागी होऊन 'कमवा आणि शिका' ही कल्याणकारी योजना यशस्वी करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांच्यावर राहते. यासर्व योजनेतून येणारे उत्पन्न हे विद्यार्थी भवनच्या अंदाजपत्रकीय तरतूदी मध्ये जमा केले जाते. या योजनेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय, जेवणाची सोय मोफत केली जाते. या योजनेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश फी व परीक्षा फी या मध्ये सवलत दिली जाते. या योजनेत विद्यार्थ्यांना दररोज ३ तास काम करावे लागते.

सन २०१८-२०१९ या वर्ष प्रथम व द्वितीय वर्ष मिळून एकूण ८० विद्यार्थी व ७३ विद्यार्थीनी असे एकूण १५३ विद्यार्थी, विद्यार्थीनीभवन मध्ये प्रवेशीत राहिले. विद्यार्थ्यांना राहण्यासाठी स्वतंत्र वसतिगृह आहे. विद्यार्थीनींची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था विद्यार्थीनी वसतिगृहात करणेत येते.

'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत सन २०१८-२०१९ मध्ये खालील उपक्रम राबविण्यात आले

१. झेरॉक्स सेंटर.
२. ग्रंथालय व अभ्यास केंद्र मधील मदतनीसचे काम.
३. प्रशासकीय विभाग व अधिविभागातील काम करणे.
४. परीक्षा विभाग,
५. दूरशिक्षण विभाग
६. एन.एस.एस.च्या १६ मेळाव्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था करण्यात आली.
७. क्रीडा आणि उद्यान विभाग.
८. इंटरनेट हॉल.
९. विद्यार्थी विकास विभागाच्या सूचनेनुसार १५ ऑगष्ट, २६ जानेवारी, व १८ नोव्हेंबर, रोजी चहाची व्यवस्था करण्यात आली.

सन २०१८-२०१९ मध्ये गणेश उत्सव साजरा केला त्यामध्ये खालील मान्यवरांनी विविध विशयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले

१. डॉ. ए. एम. गुरव, प्राध्यापक व विभागप्रमुख, वाणिज्य अधिविभाग - कौशल्य विकास .
२. डॉ. गजानन राशिनकर, प्राध्यापक, रसायनशास्त्र अधिविभाग - नेट/सेट परिक्षा
३. श्रीमती राजवैभव शोभा रामचंद्र, अंधश्रद्धा निर्मूलन समिती सचिव, - अंधश्रद्धा निर्मूलन
४. कृष्णात स्वाती व डॉ. मेघा पानसरे यांचीही व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

■■■

इंटरनेट युनिट

स्थापना : मार्च १९९९ समन्वयक : **डॉ. मि. ज. जोशी,** तांत्रिक सहायक : **श्री. क. श्री. देवरूखकर.**

इंटरनेट युनिटची विभागणी नेटवर्क सेल, वेबसाईट सेल व ग्रंथालय इंटरनेट हॉल अशी करण्यात आलेली आहे. विद्यापीठ प्रांगणात संगणक जाळे उभारणे व इंटरनेट सेवा पुरविणेसाठी नेटवर्क सेल हे युनिट स्थापन करणेत आलेले आहे. प्रांगणातील २७ अधिविभाग व मुख्य प्रशासकीय इमारत काचतंतूनी (Optiocal Fiber Cable) जोडली आहे. जुलै २००१ पासून सर्वत्र इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

सध्या बी. एस्. एन्. एल. कडून इंटरनेट सुविधेसाठी २२० एम. बी. पी. एस्. क्षमतेची लीज्ड् लाईन घेणेत आलेली आहे. नॅशनल नॉलेज नेटवर्क या योजने अंतर्गत विद्यापीठास १ जी. बी. पी. एस्. क्षमतेची लीज्ड् लाईन प्राप्त झालेली आहे. युनिटचे समन्वयक डॉ. मि. ज. जोशी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. देवरूखकर संपूर्ण नेटवर्क अद्यावत करणे व त्याची निगराणी करणेचे काम पहातात.

विद्यापीठाच्या कार्यालयीन संकेतस्थळाची (वेबसाईटची) स्थापना २० मे २००२ रोजी झाली असून संकेतस्थळ कक्ष (वेबसाईट सेल) मार्फत विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या वेबसाईट्सची देखभाल केली जाते. ४०० वेबपेजेस पेक्षा जास्त असे संकेतस्थळाचे स्वरूप आहे. विद्यापीठाच्या सर्व परीक्षांचे निकाल, संलग्न महाविद्यालयांची परिपत्रके विविध कार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका, विद्यापीठाचा वार्षिक अहवाल, विविध निविदा पत्रके, नेमणूक व प्रवेश आदिंच्या जाहिराती व विविध अर्जाचे नमुने इत्यादी माहिती वेळोवेळी वेबसाईट मार्फत प्रसिद्ध केली जातात.

सदर विभागामार्फत १० पेक्षा जास्त ऑनलाईन यंत्रणा विकसित करून यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ऑनलाईन विद्यार्थी प्रत्याभरन यंत्रणा मागील सहा शैक्षणिक वर्षाकरिता राबविली असून नॅक समितीनेही याबाबत प्रशंसा केलेली आहे. तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विद्वत सभेचे विषय व सर्व अभ्यासक्रम सी. डी. च्या स्वरूपात दिल्यामुळे वेळ, पैसा व श्रम याची मोठ्या प्रमाणावर बचत झाली आहे. या व्यतिरीक्त ऑनलाईन शिवसंदेश हे विद्यापीठाचे मासिक व इंट्रानेट हे महत्त्वाचे उपक्रम वेबसाईट सेलमार्फत सुरू आहेत. वरील विविध उपक्रमांमूळे संलग्न महाविद्यालये, विद्यार्थी व इतर वेबसाईटचा जास्त वापर करीत असल्याचे सांख्यकीय माहिती वरून दिसून आले असून अधिकाधिक माहिती व सेवा सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने वेबसाईट सेल प्रयत्नशील आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या अनुदानातून मुख्य ग्रंथालयात ४० संगणकांची इंटरनेट सुविधा असलेली प्रयोगशाळा (इंटरनेट हॉल) स्थापित करणेत आलेली आहे. विद्यापीठाच्या प्रांगणातील विद्यार्थी, संशोधक, अध्यापक त्यांच्या अध्यनाकरीता सकाळी १०.०० ते रात्री ६.०० या वेळेत इंटरनेट सुविधेचा वापर करतात. दररोज ३५० ते ४०० विद्यार्थी, संशोधक, अध्यापक या सुविधेचा लाभ घेत आहेत.

याव्यतिरीक्त विद्यार्थ्यांना सी.डी. राईटिंगची, सुविधा व छपाईची सुविधा देखील विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. याठिकाणी डॉ. मि. ज. जोशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. इंटरनेट युनिट विद्यार्थ्यांमध्ये आय. टी. विषयक जागृती होण्यासाठी अनेक उपक्रम केले.

संगणक केंद्र

* Security Antivirus Operational Training for clerical staff and faculty members. Venue Shahu Hall 19/06/2019 one day Conducted by Smt. Kharade S.S., Kalyan Deorukhakar, Ashish Ghate, Ravindra Satpute
* One day Workshop on Application Security, Network Testing and Vulnerabilities 15/6/2019 by ITAK and ISACA Venue Hotel Pearl, Kolhapur attended Smt. Kharade S.S., Dr. M.J. Joshi, Kalyan Deorukhakar attended the workshop
* Attended Workshop on 'Practical Hands-On Ethical hacking' arranged by ISACA Pune Chapter on 26/10/2018 (Ghate,Kalyan)

- Attended workshop on' Web Application security ' arranged by Computer Society of India (Mumbai Chapter) Date :- 14 and 15 Dec.,18.
* Attended Workshop on 'Practical Hands-On Ethical hacking' arranged by ISACA Pune Chapter on 26/10/2018 (Ghate, Kalyan, Satpute)

✻ बायोमॅट्रिक हजेरी पध्दतीचा वापर करून विद्यापीठाच्या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची हजेरी पत्रके तयार केली जातात. यासाठी विद्यापीठाची मुख्य प्रशासकीय इमारत व अधिविभागांच्या इमारतीमध्ये विविध ठिकाणी एकूण ४० बायोमॅट्रिक मशिन कार्यरत आहेत.

✻ विद्यापीठ परिसराच्या सुरक्षतेच्या दृष्टीने मुख्य प्रशासकीय इमारत, अधिविभाग, सर्व (मुलामुलींचे) वसतिगृहे, अतिथिगृह, परीक्षा कामाकाज विभाग, आरोग्य केंद्र, लोककला हॉल व जलशुध्दीकरण केंद्र तसेच विद्यापीठाचे ५ मुख्य प्रवेशद्वार इ. ठिकाणी ५७३ सीसी कॅमेरे व ६७ आय.पी. कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

विद्यापीठात खरेदी केलेल्या खालील संगणकीय वस्तूंची पडताळणी संगणक केंद्रामार्फत करणेत आली.

Desktops	Laptops	Projector	Server
71	10	18	01

संगणक केंद्रमार्फत केल्या जाणाऱ्या संगणक व संगणक प्रणालीशी साहित्याच्या देखभाली विषयीचा तपशील

यु.पी.एस.

संगणक	लॅपटॉप	डेस्कटॉप	ऑनलाईन	ऑफलाईन	एलसीडी-डीएलपी	सर्व्हर	थंब इन्प्रेशन मशिन	सीसीटीव्ही/ आय.पी. कॅमेरा
वार्षिक निगराणी खाली असणाऱ्या वस्तुंचे संख्या	२५३	२३७८	१३० +	१०२५ +	१३०	१०	३५	६५८
सर्व्हीस कॉलची संख्या	८८	६८८	७८	१५२	-	-	१६	४५

अभियांत्रिकी विभाग

(१) नवीन प्रस्ताव :

१. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाकरिता इमारत बांधणे.
२. फॅकल्टी हाऊसकरिता इमारत बांधणे.
३. विद्यापीठ परिसरामध्ये कन्व्हेंशन सेंटर बांधणे.
४. मुलांचे वसतिगृह बांधणे.
५. विद्यापीठ परिसरात उच्च शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाचे बांधकाम करणे.
६. विद्यापीठ परिसरातमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम करणे.
७. शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणेकरिता सब-वेचे बांधकाम करणे.
८. विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाची इमारत बांधणे. (दुसरा टप्पा)
९. भाषाभवन इमारतीमध्ये इंग्रजी विभागाकरिता इमारतीचे विस्तारीकरण करणे.
१०. शिवाजी विद्यापीठ परिसराती भोवती संरक्षक भिंत बांधणे.
११. शिवाजी विद्यापीठ सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर अंतर्गत दुरुस्ती व सजावटीची कामे करणे.

(२) शिवाजी विद्यापीठ परिसरातील पूर्ण झालेली व सुरू असलेली मुख्य बांधकामे.

१. सी.एफ.सी. इमारतीची दुरूस्ती व नूतनीकरणाचे काम करणे (दुसरा टप्पा)
२. विद्यापीठ परिसरातील राजमाता जिजाऊ साहेब बहुद्देशीय सभागृह ते फाटक क्र. ८ पर्यंतच्या रस्त्याच्या बाजुचे सुशोभिकरण करणे.
३. राजर्षी शाहू संशोधन केंद्रातील दुरुस्तीची कामे करणे.
४. विद्यापीठ परीसराभोवती संरक्षण भिंत बांधणे.
५. मा. कुलसचिव निवासस्थानाभोवती संरक्षण भिंत बांधणे.
६. विद्यापीठ परिसरामध्ये आर.बी.आय. तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ता करणे.
७. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये लांब उडी, भालाफेक, उंच उडी, गोळा, थाळी फेक इ. करिता मैदान तयार करणे.
८. मुख्य उपाहारगृहाचे दुरुस्ती व नूतनीकरण करणे.
९. युसिक इमारतीचे पत्रे बदलणे व फ्लोरींग करणे.
१०. राजमाता जिजाऊ साहेब बहुद्देशीय सभागृह येथील संरक्षण भिंतीचे विस्तारीकरण करणे.
११. रिसर्च स्कॉलर वसतिगृहाशेजारी सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे.
१२. संगीतशास्त्र तलावाशेजाराचा परिसर सुशोभित करणे.
१३. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्यासाठी नविन स्वच्छतागृह बांधणे.
१४. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये विविध ठिकाणी नामफलक, दिशादर्शक बसविणे.
१५. शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये रिसर्च स्कॉलर विद्यार्थी वसतिगृह बांधणे.
१६. रिसर्च स्कॉलर विद्यार्थी वसतिगृहकरिता स्वतंत्र भोजनकक्ष बांधणे.
१७. विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाची इमारत बांधणे.
१८. शिवाजी विद्यापीठ परीसरातील रस्ते करणे व वाहनतळ तयार करणे.
१९. विद्यापीठ परिसरांतर्गत पाणी वितरण नलिकांचे दुरूस्ती व नूतनीकरण करणे.
२०. वनस्पती शास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.
२१. भौतिक शास्त्र अधिविभाग इमारतीचे विस्तारीकरण करणे.
२२. परीक्षाभवन क्र. २ येथील स्वच्छता गृहाचे नूतनीकरण करणे.
२३. ॲनेक्स इमारतीमधील स्वच्छता गृहाचे नूतनीकरण करणे.

मुद्रणालय विभाग

शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय विभाग हा मा. कुलसचिव यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्यरत असून त्यामध्ये १ अधिक्षक, १ क्लार्क, १ शिपाई, छपाई विभागात ४ व बांधणी विभागात ५ कायमस्वरूपी तसेच ३० रोजदांरी कर्मचारी काम करतात. तसेच सन १ जुलै, २०१८ ते ३० जुन, २०१९ पर्यत झालेल्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	विभाग/अधिविभागाचे नाव	तपशील	संख्या
१	परीक्षा गोडावून विभाग	उत्तर पत्रिका छपाई महाविद्यालयीन परीक्षा (केशरी कलर) विद्यापीठ परिक्षा (ब्लॅक कलर)	२४ पानी - ६ लाख ४ पानी - ४ लाख ४ पानी - ६ लाख २४ पानी - ६.५० लाख ३६ पानी - २ लाख ४० पानी - ६ लाख
२	दूरशिक्षण विभाग	बी. ए. (पुस्तक छपाई) एम. ए. (पुस्तक छपाई) बी. कॉम. (पुस्तक छपाई)	४५ पुस्तके ५३ पुस्तके २० पुस्तके

अ.क्र.	विभाग/अधिविभागाचे नाव	तपशील	संख्या
		एम.कॉम. एम.एस्सी. एम.बी.ए.	३ पुस्तके ५ पुस्तके १ पुस्तके
३	अभ्यास मंडळे विभाग	पर्यावरण – मराठी पर्यावरण – इंग्रजी व इतर	१०,००० प्रती १५,००० प्रती
४	इतर सर्व विभाग	परीक्षा फॉर्म, पावती, पावती पुस्तके, लेजर, इ.	

■■■

१२. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या सभा

३.१ अधिसभा

अहवाल वर्षात अधिसभेच्या तीन बैठका झाल्या. या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे,

पहिली सभा : ३० जुलै, २०१८

- शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी नवीन महाविद्यालये/विद्याशाखा/ अभ्यासक्रम इ.बाबतची ठिकाणे निश्चित करण्यासाठीची नवीन सम्यक योजना (बृहत आराखडा) व शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विविध शैक्षणिक प्रस्तावांची वार्षिक योजना महाराष्ट्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

दुसरी सभा : २९ डिसेंबर, २०१८

- सन २०१७-२०१८ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) एकमताने मान्य करण्यात आला.
- शिवाजी विद्यापीठांतर्गत होणाऱ्या विविध स्थरावरील विविध क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी विद्यापीठामार्फत आरोग्य विमा तसेच अपघात विमा ज्यामध्ये खेळाडूंचा अपघात झाल्यास संबंधित खेळाडूना हॉस्पिटल व औषधांचा सर्व खर्च देण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

तिसरी सभा : १० मे, २०१९

- विद्यापीठाचे सन २०१८-२०१९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१९-२०२० चे वार्षिक अंदाजपत्रकास एकमताने मंजूरी देण्यात आली.
- शिवाजी विद्यापीठाचा सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षातील ५५ व्या वार्षिक अहवालास (मराठी आवृत्ती) एकमताने मान्यता देण्यात आली.
- विद्यापीठ स्तरावरती गुणवत्तापूर्ण व उल्लेखनीय संशोधन करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यास व शिक्षकास अनुक्रमे उत्कृष्ट संशोधक, विद्यार्थी व उत्कृष्ट संशोधक, शिक्षक असे पुरस्कार देण्यात यावेत, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे, या प्रस्तावास एकमताने मान्यता देण्यात आली.

३.२ व्यवस्थापन परिषद

अहवाल वर्षात व्यवस्थापन परिषदेच्या पंधरा बैठका झाल्या. या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे,

१६ जुलै, २०१८

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम १०७ नुसार मागील वर्षी विद्यापीठ अधिकार मंडळांनी मान्य केलेला विद्यापीठाचा पंचवार्षिक बृहत आराखडा, यामधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासनाकडून प्राप्त झालेल्या मान्यता, शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ करिताच्या पंचवार्षिक बृहत आराखड्याकरिता महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त सूचना, बृहत आराखडा तयार करण्यासाठी शासनाने पुरविलेली विवरणपत्रे, तसेच दि.१८ व १९ जुलै, २०१८ रोजी नागपूर येथे महाराष्ट्र शासनामार्फत आयोजित सहविचार सभेतील प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार विद्यापीठाचा, शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ करिताचा पंचवार्षिक बृहत आराखडा अंतिम करून तो व्यवस्थापन परिषदेच्यावतीने विद्या परिषदेला व अधिसभेला शिफारस करण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना देण्यात आले.
- जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाची नियमावली दुरुस्तीस शिफारस क्र. वगळून मान्यता देण्यात आली.
- शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती वस्तू व सेवा खरेदीसाठी स्व:त करणेस मान्यता देण्यात आली.
- शहिद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहिद पोलिस यांच्या विधवा / विधूर आणि त्यांच्या अपत्यांना मोफत सर्व शैक्षणिक सुविधा विद्यापीठ अधिविभागात प्रवेशितांना उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

१४ ऑगस्ट, २०१८

* विद्यापीठ निधीतून कार्यरत तसेच स्वावलंबी तत्वावरील अधिविभागातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार कॅस अंतर्गत पदोन्नती प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. ज्या अधिविभागामध्ये जमा रक्कमेपेक्षा खर्च जास्त आहे अशा अधिविभागाकडून वित्तीय तूट भरून काढण्याकरिता पुढील पाच वर्षाकरिता (२०१६ ते २०२४) आराखडा मागवून घेण्यात यावा.
* शाहू संशोधन केंद्रामार्फत प्रकाशित होणाऱ्या डॉ. बाळकृष्ण यांच्या Shivaji the Great शिवचरित्र या ग्रंथाची किंमत रुपये ८००/- इतकी ठेवण्यात यावी. तसेच विद्यापीठामधून खरेदी केल्यास रू.५००/- दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.
* पर्यावरणपूरक धोरणाचा भाग म्हणून विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना सायकली हप्ते पद्धतीने विकत घेऊन देण्याची योजना सुरू ठेवण्याकरीता अग्रीम रक्कम रुपये ५०००/- इतकी करण्यास व तीन वर्षातून एकावेळेस व्याजरहीत अग्रीम देणेस मान्यता देण्यात आली.
* Shivaji University Kolhapur, Maharashtra India and Oriental Institute of Technology(OTI) University, Taiwan यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.
* Shivaji University Kolhapur, Maharashtra India and Osmania University Hyderabad, India यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.
* Shivaji University Kolhapur, Maharashtra India and University of Strathelyde, UK यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

२३ ऑगस्ट, २०१८

* दूर शिक्षण अभ्यासक्रमानुसार सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक पदाची निर्मिती करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

  पुरेशी विद्यार्थी संख्या असलेल्या बी.कॉम., एम.ए. Economics, एम.ए. English, एम.ए. Hindi, एम.ए. History, एम.ए. Marathi, एम.ए. Political Science एम.ए. Sociology, एम.कॉम., एम.एस्सी. गणित, एम.बी.ए., एम.कॉम. (Valuation of Real Estate) या १२ अभ्यासक्रमाना एक सहा. प्राध्यापक आणि एक सहयोगी प्राध्यापक याप्रमाणे एकूण १२ सहा.प्राध्यापक आणि १२ सहयोगी प्राध्यापक पदे निर्माण करण्यास तसेच सहा. प्राध्यापक पदास रुपये २१,६००/- आणि सहयोगी प्राध्यापकास रुपये २५,०००/- इतके प्रतीमाह एकत्रित वेतन देण्यास मान्यता देण्यात आली.
* केरळमधील पूरग्रस्तांना मदत करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

  विद्यापीठ नैसर्गिक आपत्कालीन निधीमधून रुपये ५ लाख इतकी रक्कम मदतनिधी केरळ रिलीफ फंडसाठी पंतप्रधान निधीस देणगी म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली. मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित घटकांच्या प्रतिनिधींची बैठक घेवून प्रत्येकाने एक दिवसाचे वेतन केरळ मदत निधीसाठी देण्याचे आवाहन करण्यात यावे. महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून जमा झालेल्या निधीची रक्कम पंतप्रधान साहाय्यता निधीमध्ये जमा करावी अथवा विद्यापीठाकडे जमा करावी. जर एखाद्या महाविद्यालयाने साहाय्यता निधी केरळ रिलिफ फंडासाठी म्हणून जमा केला असेल तर त्या पावतीची प्रत विद्यापीठास पाठवावी.

५ सप्टेंबर, २०१८

* दिनांक ०३/०९/२०१८ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या बैठकीतील शिफारशी मान्य करण्यात आल्या.

२८ सप्टेंबर, २०१८

* राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना बाल संगोपन रजा मंजूर करणेबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२५/सेवा-६ दिनांक २३/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

* Shivaji University, Kolhapur and CSIR-National Chemical Laboratory (NCL), Pune - 411008 यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.
* मध्यवर्ती युवा महोत्सव विजेत्यांना विलिंग्डन महाविद्यालय शताद्वी वर्ष फिरते चषक देण्याबाबत प्राचार्य, विलिंग्डन कॉलेज, सांगली यांनी केलेली विनंती मान्य करण्यात आली.

२३ ऑक्टोबर, २०१८

* विद्यापीठ वर्धापनदिनी शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या गुणवंत पाल्यांस मिळणाऱ्या पारितोषिक रकमेत प्रथम क्रमांक रू.२०००/- द्वितीय क्रमांक रू.१५००/- आणि तृतीय क्रमांक रू.१०००/- याप्रमाणे वाढ मान्य करण्यात आली.
* कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनामार्फत सर्व संलग्न महाविद्यालयांचे करण्यात येणाऱ्या जेंडर ऑडिटसाठी Consultancy शुल्क रु.५०००/- इतके घेण्यास मान्यता देण्यात आली.
* शिवाजी विद्यापीठाच्या जुने कोल्हापूर - बेळगांव रस्त्याच्या दोन्ही बाजूस संरक्षक भिंतीवर कलात्मक पध्दतीने भित्तीचित्रांची निर्मिती करून कोल्हापूर शहराचे सौंदर्यकरण करणेच्याकामी प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच आलेल्या प्रस्तावातील निवड झालेल्या कलाकृतीबाबत कलाकारास प्रशस्तीपत्र आणि विद्यापीठाचे स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात यावा.
* पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ कबड्डी (पुरुष) स्पर्धा आयोजन करणेस मान्यता देण्यात आली.

२७ नोव्हेंबर, २०१८

* सन २०१७-२०१८ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल (अनुपालन अहवालासह) मान्य करण्यात यावेत, अशी शिफारस अधिसभेस करण्यात आली.
* विद्यापीठ अधिविभाग/संलग्नीत महाविद्यालयामधील प्रवेशित विद्यार्थीनींना एस.टी. व बस पास योजना आणि अधिकची स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती व उद्योजक यांचेकडून निधी गोळा करणेस मान्यता देण्यात आली.

१४ डिसेंबर, २०१८

* महाराष्ट्र शासन क्रमांक न्यायप्र २०१७/प्र.क्र.२१८/१७/विशि-१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.५८५/२०१७ मध्ये दिनांक ०६/११/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबत शासनाचे दिनांक १२ नोव्हेंबर २०१८ रोजीचे पत्र सर्व संलग्नित शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना लागू करण्यास आणि त्यानुसार सर्व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना कळविण्यास मान्यता देण्यात आली.
* विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांच्या संशोधन कार्यकक्षेमध्ये (Research Areas) जास्तीत जास्त संशोधन प्रकल्प हाती घ्यावेत याकरिता विद्यापीठ निधीमधून सहाय्य देण्यासाठी Research Strengthening Scheme ही योजना सुरू करण्याबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस आणि नियमावलीस दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.
* श्री. नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याच्या सन्मानार्थ त्यांना खास बाब म्हणून शिष्यवृत्ती देण्याबाबत अधिष्ठाता, मानव्यशास्त्र विद्याशाखा यांचा अभिप्राय व अध्यक्ष, अधिष्ठाता मंडळ यांनी अधिष्ठाता मंडळाच्यावतीने केलेली कार्यवाही व अ आणि ब शिफारशीस मान्यता देण्यात आली. तसेच वार्षिक रु. ५०००/- Contingency grant देण्यात यावी.
* क्रीडा स्पर्धेकरिता शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खेळाडूंना देण्यात येणाऱ्या भत्त्यामध्ये व एकत्रित सराव शिबिरासाठी देण्यात येणाऱ्या भत्त्यामध्ये वाढ करणे बाबत वित्त व लेखा समिती ने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

२५ जानेवारी, २०१९

* शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात दिल्या जाणाऱ्या दि प्रेसिडेन्ट ऑफ इंडिया मेडल फॉर जनरल प्रोफिसियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी या पारितोषिकाच्या छाननी व निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील बाळासाहेब पाटील यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

४ फेब्रुवारी, २०१९

* महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील एकरूप परिनियम २०१८ चा एकरूप परिनियम क्र. ३ सन्मान्य पदव्या आणि विद्याविषयक विशेषोपाधी एकरूप परिनियम २०१८ व एकरुप परिनियम क्र. ४ (दीक्षांत समारंभ) ची महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रा (इंग्रजी व मराठी) बाबतची विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

१८ फेब्रुवारी, २०१९

* दिनांक ०१/०१/२००६ ते दि. २७/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्ती वेतनात शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.
* विद्यापीठाचे सन २०१८-२०१९ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१९-२०२० चे वार्षिक अंदाजपत्रक महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार दुरुस्तीसह मान्य करण्यात यावे, अशी अधिसभेस शिफारस करण्यात आली. सदर ठराव मांडण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे नामनिर्देशन करण्यात आले.
* Shivaji University, Kolhapur, India and Hochschule Hannover University of Applied Science and Arts Germany यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्याबाबत मा. कुलगुरू यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय साहचर्य मंडळाच्यावतीने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
* शिवाजी विद्यापीठाचा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील ५५ वा वार्षिक अहवाल (मराठी आवृत्ती) दुरुस्तीसह मान्य करण्यात यावा, अशी अधिसभेस शिफारस करण्यात आली. सदर ठराव अधिसभा बैठकीमध्ये मांडण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य श्री.संजय जाधव यांचे नामनिर्देशन करण्यात आले.
* मा. विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्.तिक कार्य, यांच्या दि. ११ फेब्रुवारी, २०१९ च्या मेलनुसार दि.२७ फेब्रुवारी, २०१९ रोजी श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून विद्यापीठामार्फत साजरा करण्यास व सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

६ मार्च, २०१९

* महाविद्यालयीन स्तरावर पदवी वितरण समारंभासाठी शिवाजी विद्यापीठाचा ३ फूट लांब व २ फूट रूंद आकाराचा ध्वज विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांना व स्वायत्त महाविद्यालयांना उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

२२ मार्च, २०१९

* विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या जाहिराती हिंदी भाषेतही संकेतस्थळावर ठेवण्यात याव्यात. तसेच हिंदी अधिविभागामार्फत सदरचे काम करून घ्यावे व त्यासाठी मान्य दरात शुल्क अदा करण्यात यावे. डॉ. जितेंद्रकुमार त्रिपाठी, संयुक्त सचिव, युजीसी, नवी दिल्ली यांचे पत्रानुसार शिफारशीची अंमलबजावणी करत असल्याबाबत कळविण्यात यावे.
* महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाच्या कार्यकारिणी यंत्रणेशी संबंधित सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ५, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग ४- ब दि.२५ फेब्रुवारी, २०१९ नुसार कार्यवाही करण्यात यावी.
* वनस्पतिशास्त्र अधिविभागातील इनक्युबेशन व ट्रेनिंग सेंटरच्या Application Proforma व Guidelines ला मान्यता देण्यात आली.

* शिवाजी विद्यापीठ व मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमध्ये सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

२९ एप्रिल, २०१९

* ए.आय.यु., नवी दिल्ली यांचेमार्फत घेण्यात येणाऱ्या युवा महोत्सवामधील दक्षिण आशियायी आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव विद्यापीठात आयोजित करणेस मान्यता देण्यात आली.

६ जून, २०१९

* १७ वी अखिल भारतीय कुलगरू चषक टी-२० लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा २०१९ आयोजनास मान्यता देण्यात आली.
* ५५ व्या दीक्षांत समारंभात व्यासपीठावर प्रदान न केलेली पारितोषिके आणि स्मृतिचिन्हे मा. कुलगुरू यांच्या हस्ते विद्यापीठामध्ये कार्यक्रम नियोजित करून प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली.
* शिक्षक व समकक्ष पदांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या निर्णय क्रमांक No. Mise-2018 R. 56/18/UNI-1 दिनांक ८ मार्च २०१९ शासन निर्णय दिनांक २२/३/२०१९ रोजीच्या व्यवस्थपान परिषद ठरावानुसार स्वीकारण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये शासनामार्फत दिनांक १०/५/२०१९ रोजी सुधारणा करण्यात आली, सदर सुधारणा संलग्नित महाविद्यालये व अधिविभागांना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.
* 'तुकाराम बावांच्या गाथेचे निरूपण' या ग्रंथाच्या एका भागाची विक्री किंमत रू. ४२५/- ठेवण्यात यावी व विक्रेत्याला जास्तीत जास्त ५ टक्के डिस्काउंट देण्यात यावा. तसेच ग्रंथाच्या एका भागाची छपाई किंमत रू.६२५/- ठेवण्यास मान्यता देण्यात आली.
* दूरशिक्षण केंद्रामार्फत Indian Distance Education Association (IDEA), Jammu यांची २४ वी वार्षिक Conference साठी येणाऱ्या जमा व खर्चाचास मान्यता देण्यात आली. प्रवास खर्च व भोजन खर्च विद्यापीठ नियमाप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.
* Institute of Democracy & Election for Good Covenane (IDEGG) संस्थेचे नोंदणीकरण करणेसाठी व विद्यापीठामार्फत रू.५ लाखांचे योगदान देण्यास मान्यता देण्यात आली.

३.३ विद्यापरिषद

अहवाल वर्षात विद्यापरिषदेच्या चार बैठका झाल्या. या बैठकीतील महत्वाचे निर्णय खालीलप्रमाणे,

३० ऑक्टोबर, २०१८

* पदव्युतर शिक्षक मान्यता व एम.फील. / पीएच.डी संशोधन मार्गदर्शक मान्यता संदर्भातील नियमावलीमध्ये सुधारणा करणेबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

२९ जानेवारी, २०१९

* ५५ व्या दीक्षांत समारंभ सोहळ्यामध्ये पदवी/पदविका प्रमाणपत्रे, अभ्यासक्रमाची प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.
* शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करावयाच्या B.Voc. (Vocational Education) अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली.

२४ मे, २०१९

* शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी.एस्सी. भाग-१ (एन्टायर), बी.एस्सी. भाग-२ (एन्टायर) व बी.सी.ए. भाग-१ सीबीसीएस चे अभ्यासक्रम लागू करणेबाबत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेची शिफारस मान्य करण्यात आली.
* शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी.एस्सी./एम.एस्सी. भाग-२ सीबीसीएस व पीजी डिप्लोमा व डिप्लोमाचे अभ्यासक्रम लागू करणेबाबत विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेची शिफारस मान्य करण्यात आली.

- विधी अभ्यासक्रमाअंतर्गत 3 Year / 5 Year Law अभ्यासक्रमाचे पेपर मराठीमधून सोडविण्यास परवानगी देणेबाबत मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.
- M.Phil / Ph. D. Entrance व Ph. D. Course Work प्रश्नपत्रिका तसेच उत्तरे लिहिण्यासाठी मराठी माध्यमातून करणेबाबत मानवविज्ञान विद्याशाखा व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांच्या बैठकीत केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

२५ जून, २०१९

- विद्यापीठातील विविध अधिविभागासाठी हंगामी सहायक प्राध्यापक पदे निर्माण करणेबाबत अधिष्ठाता मंडळाची शिफारस मान्य करण्यात यावी, अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.
- आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत नव्याने सुरू करावयाच्या निरंतर शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली.
- वास्तुकला परिषद, नवी दिल्ली (कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर) याच्या मिनिमम स्टॅडर्स ऑफ आर्किटेक्चरल एज्युकेशन रेग्युलेशन्स २०१७ मध्ये दिलेल्या निकषानुसार वास्तुकला महाविद्यालयातील अध्यापक व प्राचार्य यांना शैक्षणिक अर्हता लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

■■■

१३. क्रीडा मंडळ व संवर्धन मंडळ

शैक्षणिक वर्षे २०१८-१९ मध्ये पश्चिम विभागीय, आखिल भारतीय आंतरविद्यापीठ तसेच २२ वी क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये खालील विविध प्रकारच्या खेळांचा सहभाग झालेला असून त्यामध्ये विद्यापीठातील संघानी वैयक्तीक व सांधिक यश मिळविले आहे.

पश्चिम विभागीय व आंतरविद्यापीठ स्पर्धा सहभाग

१. क्रॉस-कंट्री (पुरुष व महिला)
२. जिम्नॅस्टिक (पुरुष व महिला) व रि. जिम्नॅस्टिक (महिला)
३. सायकलींग (पुरूष)
४. जलतरण (पुरुष व महिला)
५. मल्लखांब (पुरुष) व रोप मलखांब (महिला)
६. बुध्दीबळ (पुरुष व महिला)
७. बास्केटबॉल (पुरुष)
८. खो-खो (महिला)
९. कबड्डी (महिला)
१०. क्रिकेट (पुरुष)
११. व्हॉलीबॉल (पुरुष)
१२. कबड्डी (पुरुष)
१३. हॅण्डबॉल (महिला)
१४. बास्केटबॉल (महिला)
१५. हॅण्डबॉल (पुरुष)
१६. फुटबॉल (पुरुष)
१७. आर्चरी (पुरुष व महिला)
१८. सॉफ्टबॉल (पुरुष)
१९. सॉफ्टबॉल (महिला)
२०. शुटिंग (पुरूष व महिला)
२१. ॲथलेटिक्स (पुरुष व महिला)
२२. खो-खो (पुरुष)
२३. बॅडमिंटन (पुरुष व महिला)
२४. वेट लिटिंग (पुरुष व महिला)
२५. बॉक्सिंग (पुरुष व महिला)
२६. कुस्ती (पुरुष व महिला)
२७. क्रिकेट (महिला)
२८. हॉकी (महिला)
२९. टेनिस (पुरुष)
३०. तलवारबाजी (पुरुष)
३१. योगा (पुरूष व महिला)
३२. फुटबॉल (महिला)
३३. हॉकी (पुरुष)
३४. ज्युदो (पुरुष)
३५. तायक्वांदो (पुरूष व महिला)
३६. रोईंग (पुरूष)
३७. टेबल टेनिस (पुरुष व महिला)
३८. सायकलिंग (महिला)
३९. कनोंकींग व कयाकींग (पुरुष)
४०. बेसबॉल (पुरुष)
४१. रग्बी (पुरुष)
४२. पॉवर लिटिंग (पुरुष व महिला) ॲन्ड बेस्ट फिजिक्स (पुरुष)
४३. तलवारबाजी (महिला)
४४. ज्युदो (महिला)
४५. टेनिस (महिला)

वैयक्तिक व सांघिक मेडल्स

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये खालील खेळ प्रकारामध्ये विद्यापीठ संघाने सांघिक व वैयक्तिक यश सपांदन केले आहे.

१) कुस्ती फ्री स्टाईल (पुरूष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१४/११/२०१८ ते दि.१८/११/२०१८ या कालावधीमध्ये चौधरी बन्सीलाल विद्यापीठ, भिवानी येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ कुस्ती (पुरूष) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये श्री. माने भैरु किसन श्री. व्ही. वाय. यादव कॉलेज, पेठ वडगांव या खेळाडूने ८६ वजन गटामध्ये सुवर्ण पदक (Gold Medal) संपादन केले आहे.

२) वेट लिफ्टींग (महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.२७/११/२०१८ ते दि. २९/११/२०१८ या कालावधीमध्ये आचार्य नागाअर्जुन विद्यापीठ, गुंटूर आंध्रप्रदेश येथे झालेल्या अखिल भारतीय आतंर विद्यापीठ वेट लिफ्टींग (महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये कुमारी मळगे

अश्विनी राजेंद्र आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले या खेळाडूने ८७+ वजन गटामध्ये सुवर्ण पदक (Gold Medal) संपादन केले आहे.

३) वेट लिफ्टींग (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१७/११/२०१८ ते दि. २०/११/२०१८ या कालावधीमध्ये कलिकत विद्यापीठ, कलिकत येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ वेट लिटींग (पुरुष) या स्पर्धेमध्ये

वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये कुमार रणजित संजय चव्हाण या खेळाडूने ७३ वजन गटामध्ये रजत पदक (Silver Medal) संपादन केले आहे.

४) मल्लखांब (पुरूष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१३/११/२०१८ ते दि. १५/११/२०१८ या कालावधीमध्ये पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ मल्लखांब (पुरूष) स्पर्धेमध्ये खालीलप्रमाणे खेळाडूंनी यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	**मल्लखांब (पुरूष)**		
१.	कुमार पाटील सुशांत चंद्रकांत, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.	सांघिक	सुवर्ण पदक
२.	कुमार दारवण कुणाल कुमार, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.	सांघिक	सुवर्ण पदक
३.	कुमार चिंचाणे केतन भिमगोंडा, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.	सांघिक	सुवर्ण पदक
४.	कुमार कंदूरकर सुहास विठ्ठल, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.	सांघिक	सुवर्ण पदक
५.	कुमार मोर अभिषेक विश्वास, श्रीपतराव चौगुले आर्टस व सायन्स कॉलेज, कोतोली	सांघिक	सुवर्ण पदक

५) रोप मल्लखांब (महिला) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

दि.१७/११/२०१८ ते दि. १९/११/२०१८ या कालावधीमध्ये पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ रोप मल्लखांब (महिला) स्पर्धेमध्ये खालीलप्रमाणे खेळाडूंनी यश संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	**रोप मल्लखांब (महिला)**		
१.	कुमारी शेवाळे वैष्णवी विलास श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर	सांघिक	कांस्य पदक
२.	कुमारी मंढारे अस्मिता सतीश किसन वीर महाविद्यालय, वाई	सांघिक	कांस्य पदक
३	कुमारी मोरे पूजा संतोष छ. शिवाजी महाविद्यालय, सातारा.	सांघिक	कांस्य पदक
४	कुमारी नाईक मानसी राजेंद्र, स्कूल ऑफ नॅनो सायन्स, शिवाजी विद्यापीठ	सांघिक	कांस्य पदक
५	कुमारी शेख शिरीन समेद, डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स ऑफ कोल्हापूर	सांघिक	कांस्य पदक

६) तलवारबाजी (महिला) आखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.०८/०१/२०१९ ते दि. ११/०१/२०१९ या कालावधीमध्ये गुरुनानक देव विद्यापीठ, अमृतसर (पंजाब) येथे झालेल्या अखिल भारतीय आतंर विद्यापीठ तलवारबाजी (महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये कुमारी. श्रैया रवी जाधव व कुमारी. ज्योती अरुण सुतार या खेळाडूने कास्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

७) आर्चरी (पुरुष व महिला) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.२६/१२/२०१८ ते दि. २९/१२/२०१८ या कालावधीमध्ये के. आय. आय. टी., भुवनेश्वर, ओडिसा येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ आर्चरी (पुरुष व महिला) या स्पर्धेमध्ये वैयक्तिक (महिला) खेळ प्रकारामध्ये कुमारी अमिता सुनिल जाधव या खेळाडूने तसेच आर्चरी (पुरुष) संघाने सांघिक कास्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

८) रग्बी (पुरुष) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा

दि.१९/१२/२०१८ ते दि. २३/१२/२०१८ या कालावधीमध्ये के. आय. आय. टी., भुवनेश्वर, ओडिसा येथे झालेल्या अखिल भारतीय आतंरविद्यापीठ रग्बी (पुरुष) या स्पर्धेमध्ये १५ $ या संघाने रौप्य पदक (Silver Medal) तसेच ७ $ संघाने सुवर्ण पदक (Gold Medal) संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळप्रकार	सांघिक/वैयक्तिक	पदक
१.	**रग्बी (पुरुष)**		
१)	कुमार चव्हाण भारत फत्तू	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
२)	कुमार चौव्हान सोमनाथ देवराम	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
३)	कुमार कोठारीकी ईश्वरराज शरणाप्पा	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
४)	कुमार पाटील रवीकिरण दिनकर	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
५)	कुमार पाटील संग्राम बळवंत	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
६)	कुमार पाटील अनिकेत शहाजी (पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा.)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
७)	कुमार निगडे श्रीधर श्रीकांत	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
८)	कुमार कांबळे प्रशांत नारायण	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
९)	कुमार पोवार विनायक महादेव	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१०)	कुमार पाटील श्रीधर संभाजी	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
११)	कुमार पाटील सुहास गुंडा	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१२)	कुमार शिंदे करणसिंह अरुण (स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१३)	कुमार गुप्ता गोविंद उमाशंकर (कॉलेज ऑफ फिजीकल एज्यू. वाडीपीयर)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१४)	कुमार राजेभोसले दीपराज शहाजी	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१५)	कुमार नाईक कौस्तुब युवराज	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१६)	कुमार पवार तुषार निवास (एल. बी. एस कॉलेज, सातारा)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१७)	कुमार चोपडे ओमकार आनंदा	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१८)	कुमार मोळे अक्षय किशोर (द न्यू कॉलेज, कोल्हापूर)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
१९)	कुमार स्वामी केदार मोहन (आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय, मेढा)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक

२०)	कुमार पाटील प्रथमेश कृष्णात (भोगावती महाविद्यालय, कुरुकली)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
२१)	कुमार फराकटे करण बाळासाहेब (दूध साखर महाविद्यालय, बिद्री)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक
२२)	कुमार पाटील अक्षय अशोक (वाय. सी वारणा महाविद्यालय, वारणानगर)	सांघिक	सुवर्ण व रौप्य पदक

*** 7$ या रग्बी खेळ प्रकारामध्ये सुवर्ण**

अ.क्र.	खेळप्रकार	महाविद्यालयाचे नाव
१)	कुमार चव्हाण भारत फत्तू	पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा
२)	कुमार चौव्हान सोमनाथ देवराम	पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा
३)	कुमार कोठारीकी ईश्वरराज शरणाप्पा	पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा
४)	कुमार पाटील रवीकिरण दिनकर	पद्मश्री डॉ. जी. जी. जाधव महाविद्यालय, गगनबावडा
५)	कुमार निगडे श्रीधर श्रीकांत	स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे
६)	कुमार कांबळे प्रशांत नारायण	स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे
७)	कुमार पोवार विनायक महादेव	स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे
८)	कुमार पाटील श्रीधर संभाजी	स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे
९)	कुमार पाटील सुहास गुंडा	स. ब. खाडे कॉलेज, कोपार्डे
१०)	कुमार गुप्ता गोविंद उमाशंकर	कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, वाडीपियर
११)	कुमार पवार तुषार निवास	एल. बी. एस. कॉलेज, सातारा
१२)	कुमार चोपडे ओमकार आनंदा	द न्यू कॉलेज, कोल्हापूर

९) खो-खो (पुरूष)

मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे दि. २७ ते २९ डिंसेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत कास्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

अ.क्र.	खेळप्रकार	महाविद्यालयाचे नाव
१)	चव्हाण सुशिल सुरेश	आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, हातकणंगले
२)	पाटील विक्रम रमेश	आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, हातकणंगले
३)	पाटील प्रसाद विजय	आण्णासाहेब डांगे आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, हातकणंगले
४)	घुणकी अरुण अशोक	श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली
५)	लांडे सुरज शितल	श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली
६)	केरीपाळे अभिषेक आनंदा	श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली
७)	जाधव निलेश आनंदा	नाईट कॉलेज ऑफ आर्टस् आणि कॉमर्स, इचलकरंजी
८)	पाटील अभिनंदन महादेव	डी. के. ए. एस. सी कॉलेज, इचलकरंजी
९)	पाटील सरदार माणिक	मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव
१०)	बाबर दिंगबर शिवाजी	दहिवडी कॉलेज, दहिवडी
११)	शिंदे सौरभ शरद	मिरज महाविद्यालय, मिरज
१२)	आंबी सौरभ कृष्णात	सहकार भूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड

१०) बॉक्सींग (महिला)

जनार्दन राय नगर राजस्थान विद्यापीठ, उदयपूर येथे दि. २६ ते ३० जानेवारी, २०१९ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघामधील कु. प्रियांका सुरेश गवळी यांनी कास्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

११) पॉवर लिफ्टींग (महिला)

कलिकत विद्यापीठ, कलिकत येथे दि. १७ ते १८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघामधील कु. सोनल सुनील सावंत (५७ किलो वजन गट) व कु. शामल बजरंग शिंगाडे (८४+ वजन गट) कास्य पदक (Bronze Medal) संपादन केले आहे.

१२) ॲथलॅटिक्स, थाळी फेक (पुरुष) : दि. २४ ते २८ नोव्हेंबर, २०१८ या कालावधीमध्ये मंगलोर विद्यापीठ, मंगलागंगोत्री येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ थाळी फेक (पुरुष) या वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये श्री. बेनके किर्तीकुमार जयप्रकाश, आर. बी. माडखोलकर कॉलेज, चंदगड या खेळाडूने सुवर्ण पदक (Gold Medal) संपादन केले आहे.

आखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा

एकूण पदक	सुवर्ण	०४
	रौप्य	०४
	कास्य	०९
	एकूण पदक	१७

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र झालेले संघ

१. बास्केटबॉल (पुरुष)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दि. १५ ते १९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या बास्केटबॉल (पुरुष) संघाने चौथा क्रमांक संपादन केले व एस. आर. एम चेन्नई विद्यापीठ, येथे दि. २८ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत झालेल्या आखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

२. बुध्दीबळ (महिला)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी नगर, अकोला येथे दि. २९ नोंव्हे ते ०३ डिंसेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या बुद्धिबळ (महिला) संघाने व्दितीय क्रमांक संपादन केला व गुरु जंबेवर विद्यापीठ, हिसार, हरियाणा येथे दि. १० ते १४ डिसेंबर, २०१८ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

३. खो-खो (महिला)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव येथे दि.१९ ते २२ नोंव्हेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या खो-खो (महिला) संघाने तिसरा क्रमांक संपादन केला व राम मनोहर लोहिया अवध विद्यापीठ, फैजाबाद येथे दि.०७ ते १० डिसेंबर, २०१८ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

४. कबड्डी(पुरुष)

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. २६ ते ३० नोंव्हेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या कबड्डी (पुरुष) संघाने प्रथम क्रमांक संपादन केला व के. आय. आय. टी भुवनेश्वर येथे दि. २६ ते २९ डिंसेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

५. हॉकी (पुरुष)

एल.एन.आय.पी.ई., ग्वॉलियर येथे दि. ०२ ते ०६ नोंव्हेबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या हॉकी (पुरुष) संघाने तिसरा क्रमांक संपादन केला व एन. एच. टी. एस दिल्ली, येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

६. खो-खो (पुरुष)

मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे दि. २२ ते २६ डिसेंबर, २०१८ या कालावधीत झालेल्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठच्या खो-खो (पुरूष) संघाने तृतीय क्रमांक संपादन केला. मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे दि. २७ ते २९ डिंसेबर, २०१८ या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता पात्र ठरला.

२२ वी क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये ॲथलेटीक्स खेळ प्रकारामध्ये विद्यापीठ संघातील खेळाडू विद्यार्थ्यांनी वैयक्तिक यश सपंदान केले आहे ते खालीलप्रमाणे.

अ.क्र.	खेळाचा प्रकार	खेळाडूचे नांव	क्रमांक
१	गोळाफेक व भालाफेक	श्री. कीर्तीकुमार बेनके	प्रथम
२	लांब उडी व उंच उडी	कु. प्रगती संकपाळ	प्रथम
३	थाळी फेक	कु. निशिगंधा मोरे	प्रथम
४	४१०० मी. मिक्स रीले	कु. श्रावणी जंगले, श्री. रघु डोणे, कु. प्रगती संकपाळ व श्री. सचिन धोत्रे	प्रथम
५	४४०० मी. रीले मुले	श्री. कृष्णात पाटील, रघु डोणे, रामदास पाटील व सचिन धोत्रे	प्रथम
६	४१०० मी. रीले मुले	श्री. कृष्णात पाटील, रघु डोणे, रामदास पाटील व सचिन धोत्रे	द्वितीय
७	४४०० मी. मिक्स रीले	श्री. कृष्णात पाटील, रामदास पाटील, कु. श्रावणी जंगटे, कु. मेघाश्री बिराजदार	द्वितीय
८	८०० मी. रनिंग	श्री. रामदास पाटील,	द्वितीय
९	उंच उडी	श्री. ऋषिकेश काटे	द्वितीय
१०	५००० मी. रनिंग	श्री. निलेश मुंगळे	तृतीय
११	५००० मी. रनिंग	कु. वैष्णवी सावंत	तृतीय
१२	लांब उडी	श्री. अनिकेत घोरपडे	तृतीय
१३	गोळा फेक	कु. नंदिनी पांढरे	तृतीय
१४	४०० मी रनिंग	कु. श्रावणी जंगटे	तृतीय
१५	४०० मी रनिंग	श्री. कृष्णात पाटील	तृतीय
१६	उंच उडी	कु. रसिक माळी	चतुर्थ
१७	१५०० मी. रनिंग	कु. वैष्णवी सावंत	चतुर्थ
१८	८०० मी. रनिंग	श्री. गणेश काळे	चतुर्थ

एकूण : ७ सुवर्ण + ४ रौप्य + ६ कास्य + ३ चतुर्थ अशी एकूण २० पदके मिळविली आहेत.

ॲथलेटिक्स सांघिक मुला व मुलीमध्ये द्वितीय क्रमांक

२२ वी क्रीडा महोत्सव स्पर्धेमध्ये खालील खेळ प्रकारामध्ये विद्यापीठ संघाने सांघिक मिळविलेले यश खालीलप्रमाणे

Sr. No.	Games	Placement
१	ॲथलेटीक्स (पुरुष)	द्वितीय क्रमांक
२	ॲथलेटीक्स (महिला)	द्वितीय क्रमांक
३	बास्केटबॉल (महिला)	तृतीय क्रमांक
४	कबड्डी (पुरुष)	प्रथम क्रमांक
५	कबड्डी (महिला)	तृतीय क्रमांक
६	खो-खो (पुरुष)	तृतीय क्रमांक
७	खो-खो (महिला)	तृतीय क्रमांक
८	हॉलीबॉल (महिला)	तृतीय क्रमांक

एकूण पदक	सुवर्ण	०८
	रौप्य	०४
	कास्य	११
	चर्तुथ	०३
	एकूण पदक	**२६**

■■■

१४. विद्यापीठ विद्यार्थी मंडळे, उपक्रम व युवा महोत्सव

१. युवा महोत्सव

शिवाजी विद्यापीठ ३८ वा युवा महोत्सव २०१८-१९

सन २०१८-१९ मधील ३८ व्या युवा महोत्सवाच्या आयोजनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे युवा महोत्सव समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

१.	**मा. प्रा. डॉ. देवानंद शिंदे** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	अध्यक्ष
२.	**मा. डॉ. डी. टी. शिर्के** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
३.	**मा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
४.	**मा. श्री. व्ही. टी. पाटील** वित्त व लेखाधिकारी	सदस्य
५.	**मा. डॉ. एन. बी. गायकवाड** वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
६.	**मा. प्राचार्य एम. एल. होनगेकर** आजरा महाविद्यालय, आजरा	सदस्य
७.	**मा. प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर** विलिंग्डन कॉलेज, सांगली	सदस्य
८.	**मा. डॉ. टी. के. करेकट्टी** इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर	सदस्य
९.	**मा. डॉ. विनोद ठाकूर देसाई** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर	सदस्य
१०.	**मा. प्राचार्या डॉ. विजया रवींद्र चव्हाण** विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगांव	सदस्य
११.	**मा. प्रा. सौ. संजीवनी पाटील** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज	सदस्य
१२.	**मा. प्रा. डॉ. संपतराव रामचंद्र पार्लेकर** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस	सदस्य
१३.	**मा. डॉ. आर. व्ही. गुरव** संचालक, विद्यार्थी विकास	सदस्य सचिव

युवा महोत्सव कार्यशाळा, जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव, इंद्रधनुष्य व पश्चिम विभागीय युवा महोत्सवासाठीच्या विद्यापीठ संघाचे निवड शिबीर, सराव शिबीर इ. बाबतच्या नियोजनासाठी व सदर कार्यक्रमांचा अहवाल सादर करण्यासाठी उपरोक्त युवा महोत्सव समितीच्या बैठका खालील तारखांना आयोजित करण्यात आल्या होत्या.

१. दि. ०८/०८/२०१८,
२. दि. १२/१०/२०१८
३. दि. १३/०५/२०१९

युवा महोत्सवाबाबत एकदिवसीय कार्यशाळा २०१८–१९

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणेसाठी विद्यापीठामार्फत दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन करणेत येते. तथापि सदर युवा महोत्सवाची माहिती होण्याचे दृष्टीने, सदर युवा महोत्सवामध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी होण्याच्या हेतूने तसेच युवा महोत्सवातील विविध कलाप्रकरांची शास्त्रशुद्ध व तांत्रिक माहिती देण्याच्या दृष्टीने विद्यार्थी विकास विभागामार्फत कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्हयात युवा महोत्सवाबाबत माहिती देणेसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते.

अ.क्र.	जिल्हा	महाविद्यालयाचे नाव / दिनांक	सहभागी महाविद्यालये	प्राध्यापक	विद्यार्थी/ विद्यार्थिनी
१	सातारा	मुधोजी कॉलेज, फलटण, सातारा दि. १३/०७/२०१८	२४	४६	१०७
२	सांगली	विलिंग्डन कॉलेज, सांगली दि. १४/०७/२०१८	३६	४६	९५
३	कोल्हापूर	वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दि. १५/०७/२०१८	२९	३२	९३

सदर कार्यशाळेसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात विविध महाविद्यालयांकडून प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. या तिन्ही कार्यशाळेसाठी श्री. गिरीश भुतकर, भोर; श्री. निलेश सावे, मुंबई; श्री. सुमित चाचे, मुंबई व श्री. विजय जाधव, मुंबई; तसेच श्री. बबन माने, कोल्हापूर; यांनी युवा महोत्सवाबाबत उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन केले.

सालाबादप्रमाणे याही वर्षी युवा महोत्सवाचे आयोजन द्विस्तरीय पद्धतीने करण्यात आले होते.

जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०१८–२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मधील जिल्हास्तरीय युवा महोत्सव ऑक्टोंबर, २०१८ मध्ये खालील महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला होता.

अ.क्र.	जिल्हा	महाविद्यालयाचे नाव	आयोजनाची दिनांक
१	सातारा	डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगांव, सातारा	२६/१०/२०१८
२	कोल्हापूर	महावीर महाविद्यालय, कोल्हापूर	२७/१०/२०१८
३	सांगली	श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली	२९/१०/२०१८

जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये एकूण १४ कलाप्रकारांमध्ये स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. एकांकिका, लघुनाटिका, लोकनृत्य, लोककला, लोकसंगीत वाद्यवृंद, भारतीय समुहगीत, मुकनाट्य, वादविवाद, प्रश्नमंजुषा, पथनाट्य, सुगम गायन, वक्तृत्व स्पर्धा – (मराठी, इंग्रजी, हिंदी) व नकला ज्या महाविद्यालयाने सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक/ द्वितीय क्रमांक/ तृतीय क्रमांक प्राप्त केले आहे त्या महाविद्यालयांना मध्यवर्ती युवामहोत्सवामध्ये सादरीकरणासाठी परवानगी देण्यात आली होती.

मध्यवर्ती युवा महोत्सव २०१८–२०१९

शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मधील मध्यवर्ती युवा महोत्सव दि. ३१ ऑक्टोंबर, २०१८ ते ०२ नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे आयोजित करण्यात आलेला होता. सदर युवा महोत्सवामध्ये दोन प्रकारे स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती.

१ **सांघिक स्पर्धा**

१.	पाश्चिमात्य समुहगीत	२.	सांघिक रचनाकृती

२ **वैयक्तिक स्पर्धा**

१.	शास्त्रीय गायन	२.	शास्त्रीय सुरवाद्य
३.	शास्त्रीय तालवाद्य	४.	शास्त्रीय नृत्य
५.	पाश्चिमात्य एकलगायन	६.	स्थळ चित्र
७.	व्यंगचित्र	८.	भित्तीचित्र
९.	कातरकाम	१०.	स्थळ छाया चित्रण
११.	मातीकाम	१२.	रांगोळी
१३.	एकपात्री अभिनय	१४.	पाश्चिमात्य एकल वाद्यवादन
१५.	मेहंदी		

उपरोक्त कलाप्रकारामध्ये क्रमांक मिळवून सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या विजेत्या महाविद्यालयांना खालीलप्रमाणे बक्षीसे देण्यात आलेली आहेत.

१. सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक – किसनवीर महाविद्यालय, वाई

२. सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक – आजरा महाविद्यालय, आजरा

३. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरते गौरव चषक

१. नृत्य विभाग – आजरा महाविद्यालय, आजरा आणि किसनवीर महाविद्यालय, वाई (विभागून)

२. नाट्य विभाग – विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

३. संगीत विभाग – विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर

४. कला विभाग – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर

५. वाङ्मय विभाग – डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगांव

४. वैयक्तिक व सांघिक स्पर्धा चॅम्पियनशिप फिरता चषक

१. प्रथम कुलगुरू स्वर्गीय डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा
देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर आणि वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड (विभागून)

२. अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा – विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

२. आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०१८–१९

सन २०१८–२०१९ मध्ये विद्यापीठास तिसऱ्या आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान AIU कडून मिळाला होता. त्याअनुषंगाने कव्वाली स्पर्धेचे नियोजन करण्यासाठी खालीलप्रमाणे मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली संयोजन समितीची नियुक्ती करण्यात आली होती.

१.	**मा. प्रा. डॉ. देवानंद शिंदे** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	अध्यक्ष
२.	**मा. डॉ. डी. टी. शिर्के** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
३.	**मा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
४.	**मा. श्री. एम. ए. काकडे** संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ	सदस्य
५.	**मा. श्री. व्ही. टी. पाटील** वित्त व लेखाधिकारी	सदस्य
६.	**मा. डॉ. एन. बी. गायकवाड** वनस्पतीशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य

७.	**मा. श्री. अमित कुलकर्णी** व्य. प. सदस्य	सदस्य
८.	**मा. प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे** व्य. प. सदस्य	सदस्य
९.	**मा. डॉ. आर. जी. कोरबू** व्य. प. सदस्य	सदस्य
१०.	**डॉ. श्रीमती भारती पाटील** युवा महोत्सव समिती सदस्य	सदस्य
११.	**मा. प्राचार्य एम. एल. होनगेकर** आजरा महाविद्यालय, आजरा	सदस्य
१२.	**मा. प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर** विलिंग्डन कॉलेज, सांगली	सदस्य
१३.	**मा. डॉ. टी. के. करेकट्टी** इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर	सदस्य
१४.	**मा. डॉ. विनोद ठाकूरदेसाई** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर	सदस्य
१५.	**मा. प्राचार्य डॉ. युवराज गोंडे** युवा महोत्सव समिती सदस्य	सदस्य
१६.	**मा. प्राचार्या डॉ. विजया रविंद्र चव्हाण** विजयसिंह यादव कॉलेज, पेठवडगांव	सदस्य
१७.	**मा. प्रा. सौ. संजीवनी पाटील** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज	सदस्य
१८.	**मा. प्रा. डॉ. संपतराव रामचंद्र पार्लेकर** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस	सदस्य
१९.	**मा. डॉ. राजन गवस** युवा महोत्सव समिती सदस्य	सदस्य
२०.	**मा. डॉ. टी. पी. शिंदे** मुधोजी महाविद्यालय, फलटण	सदस्य
२१.	**मा. डॉ. शिवाजीराव भुकेले** घाळी कॉलेज, गडहिंग्लज,	सदस्य
२२.	**मा. श्री. व्ही. एस. सोयम** उपकुलसचिव, आस्थापना	सदस्य
२३.	**मा. डॉ. डी. के. गायकवाड** संचालक, रा. से. यो.	सदस्य
२४.	**मा. डॉ. पी. टी. गायकवाड** संचालक, क्रीडा विभाग	सदस्य
२५.	**मा. डॉ. आर. व्ही. गुरव** संचालक, विद्यार्थी विकास मंडळ	सदस्य सचिव

भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने दि. २२ व २३ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे राष्ट्रीय आतंरविद्यापीठ कव्वाली स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेत खालीलप्रमाणे भारतातील विविध राज्यातील विद्यापीठांनी सहभाग घेतला होता.

१. बनस्थळी विद्यापीठ, राजस्थान
२. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
३. डॉ. हरिसिंग गौर विश्वविद्यालय, सागर, मध्यप्रदेश
४. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
५. मुंबई विद्यापीठ, मुंबई
६. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ, फगवारा, पंजाब
७. महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, हरियाणा
८. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खाली नमूद एकूण १० विद्यार्थ्यांच्या संघाने सहभाग घेतला.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	महाविद्यालयाचे नाव	सहभागी स्पर्धेचे नाव
१	कु. संज्योती सुर्यकांत जगदाळे	भारती विद्यापीठ मातोश्रीबयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगांव, जि. सांगली.	राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०१८-१९, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
२	कु. विनायक विष्णू लोहार	पदार्थविज्ञानशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	
३	कु. विशाल सुभाष स्वामी	दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, जि. कोल्हापूर.	
४	कु. ओंकार धनाजी पाटील	विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर	
५	कु. जीवन मारूती पाटील	विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर	
६	कु. अनिकेत विलास देशपांडे	मुधोजी कॉलेज फलटण, जि. सातारा	
७	कु.आदिती सुरेश धनवडे	गांधी स्टडीज केंद्र, शिवाजी विद्यापीठ, जि. कोल्हापूर	
८	कु.महेश रामा अटक	मुधोजी कॉलेज फलटण, जि. सातारा	
९	कु. मोहिनी सुहास मुळीक	जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर.	
१०	कु. काजल मधुकर नरूटे	डॉ.पतंगराव कदम कॉलेज, सांगलीवाडी, जि. सांगली	

सदर संघाने अतिशय दर्जेदार कव्वाली सादर करुन प्रेक्षकांची वाहवा मिळवत रू. १२,५००/- च्या रोख बक्षिसासह प्रथम क्रमांक प्राप्त केला.

३. १६ वा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव २०१८-१९

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सोळावा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव दि. ०७ ते ११ डिसेंबर, २०१८ या कालावधीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करणेत आला होता.

या युवा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकूण ४० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. सदर संघासोबत पुरुष संघव्यवस्थापक डॉ. दीपक सी. कांबळे व महिला संघव्यवस्थापक डॉ. शहीन ए. पटेल तसेच प्रशासकीय कर्मचारी व सहाय्यक, श्री. व्ही. बी. इंगवले व शिपाई, श्री. पी. बी. वास्कर हे गेले होते. सदर युवा महोत्सवामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

१. कु. उदय आप्पासाहेब गोंजारी
२. कु. वैष्णव विश्वनाथ चव्हाण
३. कु. हर्षवर्धन हरिश्चंद्र पाटील
४. कु. विनायक विष्णू लोहार
५. कु. जीवन मारूती पाटील
६. कु. नीरज मोहन सबनीस
७. कु. करण दीपक आयरेकर
८. कु. ऋषीकेश सुनिल देशमाने
९. कु. ओकांर धनाजी पाटील
१०. कु. नितीन मल्हारी शिंदे
११. कु. वहिदा राजू शेख
१२. कु. प्रियांका रमेश राऊळ
१३. कु. अक्षय अरविंद कडोल
१४. कु. सृष्टी सुरेश गुरव
